
# चैतन्य सुमने

अंक ०३ ८ फेब्रुवारी २०२४

**अखिल हिंदू धर्मियांचे दैवत व श्री महाराजांच्या प्रिय रामरायाची प्रतिष्ठापना अयोध्येत मोठ्या दिमाखात झाली. या आनंदाच्या प्रसंगी सर्व राम भक्तांना शुभेच्छा!**




चैतन्य सुमने या नियतकालिकाचा हा तिसरा अंक प्रसिद्ध करताना आनंद होत आहे. भक्तांची शब्द सुमने श्रींच्या चरणाशी वाहण्याची भावना लक्षात घेऊन संस्थानतर्फे एक व्यासपीठ उपलब्ध व्हावे या कल्पनेने हे नियतकालिक प्रसिद्ध करण्यात येत आहे. केवळ अंत:करणपूर्वक केलेली साधना वा प्रार्थना यांना त्यांच्याकडून प्रतिसाद मिळतो व त्यांचा कल्याणमयी हात आपल्या प्रपंचात अनुभवास येतो हे समजण्यास व त्यामुळे आपल्या श्रद्धेस बळकटी येण्यास मदत होईल. हे प्रसिद्ध करण्यामागची हीच भावना आहे. यापुढेही आपले लेख chaitanya.smaran23@gmail.com या ईमेल वर ‘चैतन्य सुमने साठी’ अशी नोंद करून पाठवाव्या. सर्व भक्तांना नववर्षाच्या शुभेच्छा!

**– आपले विश्वस्त मंडळ, चैतन्योपासना**



## मागणे हेचि चरणी

सच्चिदानंद परब्रह्म। सर्वांतरीचा आत्माराम।
तैसा दाशरथी राम। रूपे अनंत ॥१॥

सकल विश्व उध्दारक। नव चैतन्य संजीवक।
तापत्रयाचे नाशक। ब्रह्मचैतन्य ॥2॥

आपुले स्वरूप विमल। ओंकार स्वरूप निर्मळ।
नाम सत्य, रूप कोमल। नामावतारी ॥३॥

नामाचे साधन थोर। नामाचा महिमा अपार।
भवभयाचा घोर। न उरे कदा ॥४॥

नाम घ्यावे नित्य। भेटे परमेश सत्य।
सांगितली ही प्रचित। सद्गुरुंनि ॥५॥

नाम येता वैखरीत। स्थिरावते मग परेत।
नामचि होऊनि जाती। जीवभाव ॥६॥

नाम आणि भक्त। होत नाही विभक्त।
आत्मा हे परमतत्व। एकात्म ब्रह्मरूपी ॥७॥

नामाचे दिले दान। अंत:करण झोळी पसरवून।
सकल विश्वाचे होवो कल्याण।
मागणे मागते नामदासी ॥८॥

**सौ.सरिता नरसिंह अवधानी**




**८ फेब्रुवारी –पू.बाबा बेलसरे यांचा जन्मदिवस. त्यानिमित्त गोंदवले येथील एका नाम साधना शिबीरातील पहिल्या निरूपणाचे शब्दांकन!**



शिबिराचे हे वातावरण पाहिले म्हणजे मला एकदम आश्रमाची आठवण होतेय बघा. भागवतामधे असे आहे, त्या नदीकाठीं ऋषी बसलेले आहेत आणि शुकाचार्य सांगताहेत तो किती सुंदर प्रसंग असेल? तसे तुम्ही सगळे स्त्री–पुरुष ऋषी बसलेले आहांत पण सांगणारा शुकाचार्य नाही बघा! हा कालमहिमा आहे. त्याला काय करायचे? पण हे खरेंच आहे! हे किती पवित्र वातावरण आहे बघा! बाहेर काय परिस्थिती फाटकाच्या बाहेर ती तुम्ही पहाता ना? त्या परिस्थितीमधें महाराजांनी हे केवढे स्थान निर्माण केलेले आहे. त्या पुरुषाचे केवढे उपकार आहेत - काय सांगावे आपल्याला? म्हणून माझा पहिला नमस्कार आहे महाराजांना! त्यांच्या दोन्ही गोष्टी आहेत. १) आपण सर्वजण प्रपंचांत इतकी तापलेली माणसे, त्यांना दिलासा देण्यासाठी त्यांनी हे काय स्थान निर्माण केलेय बघा - हे एक. आणि दुसरं २) माझेतर मायबापच आहेत ते! मी कसें विसरूं त्यांना? किंबहुना पदोपदी त्यांचे स्मरण रहावे म्हणूनच मी या भानगडीत पडतो. प्रत्येक कृतींत त्यांचे स्मरण होत रहावे. माझ्या हातून काही नामस्मरण होत नाही. मला ते वैराग्य नाही, मला निष्ठा नाही.

पण ते माझे आहेत! असे खरे वाटते बुवा! मी त्यांचा आहे असे वाटत नाही मला. 'ते माझे आहेत' आणि 'मी त्यांचा आहे' यात फरक आहे! 'मी त्यांचा आहे' असे वाटल्यावर संपले आपले काम. पण ते माझे आहेत असे वाटते. आणि मी नेहमी म्हणतो. अनेकांच्या कटकटी मी रोजच ऐकतो – जगांत अतिशय दुःख आहे. स्त्रियांना काय, पुरुषांना काय सर्वांना दुःख आहे. ते दुःख हलके करण्याचे स्थान त्यांनी निर्माण करून ठेवलेय हे. हा त्यांचा केवढा उपकार आहे जगावर! तुम्ही तुमची सर्व गाऱ्हाणी त्याना सांगता. सर्वांची सगळी निवारण करतील असे नव्हे पण त्यांना सांगितल्यावर किती शांत वाटते मनाला! म्हणून पहिला नमस्कार माझा महाराजांना आहे!

दुसरा नमस्कार तुम्हां सर्व स्त्री–पुरुषांना करतो. यांत खोटी नम्रता नाही हो! असे आहे बघा – जगांत किती संघर्ष आहे सगळीकडे! अशा संघर्षाच्या काळांत तुम्ही सर्वजण येऊन इथें अडचणीत रहाता इथे येऊन शांतपणे बसता ही केवढी भगवंताची कृपा आहे बघा! मानसशास्त्रज्ञ असे सांगतात की, 'सर्वांचे मिळून एक मोठे मन तयार होते.' मनाच्या तीन पायच्या आहेत. पहिले १) व्हेकंट माईंड. म्हणजे झोपेंत जसे आपले मन होते. त्या मनांत घाण असते पण एखादे गटार झाकून जसे टाकावे तसे ते मन असते. दुसरे आहे – २) सायलेंट माईंड. विचारशून्य मन. आणि आपल्याला हे साधायचे आहे बरे का! नामामधें प्रथम मन रिकामे होईल. व्हेकंट होईल. नंतर ते शांत होईल. आणि तिसरे आहे ३) कॉस्मिक माईंड – विश्वमन होऊन जाईल. आपल्या सगळ्यांचे मन हे त्या विश्वमनाचे प्रतीक आहे. ग्रुप माईंड म्हणतात त्याला. आणि त्या मनाला मी नमस्कार करतो. सगुण निराकार जे आहे, ते हे मन आहे. येवढी माणसे महाराजांच्या नांवाखाली इथे जमतात. केवढे त्यांचे उपकार आहेत आपल्यावर. तेव्हा तुम्हाला माझा दुसरा नमस्कार.

**जगांत अतिशय दुःख आहे.**
**स्त्रियांना काय, पुरुषांना काय**
**सर्वांना दुःख आहे.**
**ते दुःख हलके करण्याचे स्थान**
**त्यांनी निर्माण करून ठेवलेय हे.**
**हा त्यांचा**
**केवढा उपकार आहे जगावर !**

तिसरे असें आहे – जगांत सगळीकडे स्वार्थ आहेच ! तुम्ही पहाता ना? पण इथले जे पंच आहेत ना, त्यांना मी जवळून पाहिलेले आहे. मी त्यांची तोंडदेखली स्तुती करीत नाहीये – किंवा मला त्यांच्यापासून काहीं अपेक्षाही नाहीये. ते अतिशय निःस्वार्थी आहेत! त्यांचे प्रपंच त्यांना आहेत हो! आणि चांगली परिस्थिती आहे. पण ते लोकांकरतां इतके कष्ट करतात. ते पाहिल्यावर मला तर असे वाटते कीं महाराजांची प्रेरणा असल्याशिवाय हे होणेच शक्य नाही. म्हणून माझा तिसरा नमस्कार पंचांना आहे. हे रघुनाथराव आहेत. अण्णासाहेब आहेत. बापूसाहेब आहेत. बाळासाहेब आहेत. हे पंच आहेत ना? यांना मी साहेब म्हणतो त्याला अर्थ आहे. अनंतदास रामदासी नावाचे चांगले सत्पुरुष होऊन गेले. मराठवाड्यांत होते ते. ते समर्थांना साहेब म्हणायचे. साहेब हा मूळ पर्शियन शब्द आहे. साहेब माझा मालक. माझे हीत करणारा मालक. कल्याण करणारा तसे पंचही फार चांगली माणसे आहेत. आणि मी अतिशय नम्रतेने म्हणतो जोपर्यंत इथे हे निःस्वार्थपण आहे. पैशाची अपेक्षा नाही, बाकीची नीतीमत्ता आहे – एकदां गांधी म्हणाले होते 'वुईमेन आर सेफ इन माय कंपनी!' तसे या कंपाऊंडमधे वुईमेन आर सेफ. हे जोपर्यंत आहे ना इथे, तोपर्यंत गोंदवल्याचा

उत्कर्ष आहे हे ध्यानांत ठेवा आपण.

आपला विषय सुरू करायच्या आधी थोडक्यात सांगतो. काल एकजण भेटले. म्हणाले मी उद्या संध्याकाळी जाणार आहे. मला पांच दिवस काही थांबता येणार नाही. तेव्हां उद्या थोडक्यात सांगाल का? पांच दिवसांचा विषय अर्ध्या तासांत कसा सांगणार? मला संवय आहे कॉलेजची. परीक्षा आल्या म्हणजे विद्यार्थी म्हणत, 'परीक्षेला काय येणार ते थोडक्यात सांगा.' त्याची सवय आहे थोडीशी. तेव्हा सांगतो थोडक्यात. मला एक सूफी साधूचा शेर आठवतो. "तूं को इतना मिटा दे की तुझमे दुईकी बू न रहे।" द्वैताचा वाससुद्धां येऊ नये इतकां तूं स्वतःला नाहीसा कर. तूं स्वतःला इतका विसरून जा की तुझ्यामधे द्वैताचा वाससुद्धा रहाणार नाही. हे आपल्याला इथे येऊन शिकायचे आहे. महाराजांच्यामधें, तुमच्या देवतामधे किंवा जे तुमचे गुरू असतील त्यांच्यामधें इतके विलीन होऊन जा की मी नाहीच तेच आहेत! अशी वृत्ती होणे हे शिकायचे आहे आपल्याला मी मला स्वतःला पुसायला इथे शिकायचे आहे. लहान मुले चित्रे काढतात. चित्र चांगले मनासारखे येत नाही त्यांना. मग ते आपले चित्र रबरने पुसून टाकतांत. स्वतः काढलेले चित्र स्वतःच पुसून टाकतात. तसे आपण जो आपला मी बनवलेला आहे, तो आपण स्वत:च पुसून टाकायचा आहे. स्वतःहूनच स्वतःला नाहीसे करायचे आहे.

**कान्हभये प्राणमय**
**प्राणभये कान्हमय।**
**हृदयमे न जाने**
**कान्ह है या प्राण है॥**

त्याच्या तीन पायऱ्या आहेत. महाराज म्हणाले, एक दगड अतिशय तापलेला आहे! तो जर गंगेत ठेवला तर तो थंड होतो. दगड नरम होत नाही – पाणी त्याच्या आत जात नाही पण तो जो तापलेला होता तो थंड झाला.

१) तसे 'मी त्याचा आहे' हे जर पटले मनाला, तर दगड गंगेत ठेवल्यासारखे आहे. ही पहिली पायरी आहे. दुसरी पायरी मी नाहीसा करण्याची अशी आहे.

२) एकाने गंगेत स्नान करून भिजलेले धोतर सोडले तर ते ओले धोतर कोणी उचलल्याशिवाय जागचे हालत नाही. पाणी धोतराच्या आत-बाहेर होते. धोतर हे धोतरच राहिले. त्याचे सूत बदलले नाही पण धोतर नरम झाले. तसे 'मी तुझा आहे' हे जर मनाला पटले तर ते भिजलेल्या धोतरासारखें आहे. धोतरही आत बाहेर थंडच आहे. तरीही ते कमीच आहे. पण तिसरे जे आहे ते

३) साखर जर गंगेच्या पाण्यात सोडली तर पाणी गोड होऊन जाते – साखर स्वतः विरघळूनच जाते. तिचे स्वतःचे अस्तित्वच रहात नाही. इतकी ती थंड होऊन जाते. तसे 'मी तूंच आहे!' असे म्हटल्यावर "तू को इतना मिटा दे की तुझमे दुई की बू ना रहे।" असे झाल्यानंतर माझ्या हृदयांत मग मी आहे का तू आहेस? याचे भानच उरणार नाही. वृदांवनाचा एक साधू म्हणतो. कान्हभये प्राणमय प्राणभये कान्हमय। हृदयमे न जाने कान्ह है या प्राण है॥ कान्ह-कृष्ण. कृष्ण हा प्राणमय झाला. प्राण कृष्णमय झाले. आणि आता अशी स्थिती आहे की हृदयांत कृष्ण आहे का प्राण याचा पत्ताच लागत नाही.

हे आपल्याला शिकायचे आहे. माझ्या अंतःकरणांत मी आहे कां महाराज आहेत? असे

झाले पाहिजे. हे आहे या शिबीराचे ध्येय! मला हे कसे साधेल? अशी मनांत भीती ठेवू नका! आपण किंबहुना तुम्ही तुमचा हात पुढे करा महाराज तुमचा हात धरून शेवटपर्यंत नेतील. ते म्हणाले, “ज्यानें माझ्या हातांत आपला हात दिला, त्याचा हात सरळ मी रामाच्या हातांत नेऊन दिला.” हे आश्वासन आहे आपल्याला. त्यांचेच वचन आहे – ‘एकदां पायावर डोके ठेवावे ते उचलूच नये पुन्हा!’ म्हणजे मी शरणच आहे तुला! रामकृष्ण म्हणाले, “गंगेत एक मोठी होडी असते. तिला लहान-लहान होड्या बांधतांत. मोठी होडी जिकडे जाते तिकडे त्या लहान होता आपोआपच जातात.” तसे आपण आपली होडी महाराजाना बांधून ठेवावी. महाराज मग जिकडे जातील तिकडे आपल होडी जाईल आणि महाराज जातील कुठे? परमात्म स्वरूप जाईल कुठे? कासेगांवकरांनी महाराजांना विचारले,“आपण असता कुठे?” तर महाराज म्हणाले “अहो, मी नाही अशी जिथे जागाच नाही तर मी आहे कुठे ते कसें सांगू?” अहो ते सर्वव्यापीच आहेत!

**रामकृष्ण म्हणाले, “गंगेत एक मोठी होडी असते. तिला लहान-लहान होड्या बांधतांत. मोठी होडी जिकडे जाते तिकडे त्या लहान होता आपोआपच जातात.” तसे आपण आपली होडी महाराजाना बांधून ठेवावी.**

आपण सर्वजण स्त्री-पुरुष जगात रहातो, समाजात रहातो आणि समाजात असे अनेक प्रश्न येतात कीं ते आपल्या मनाला ताप देतात. माणसाच्या जीवनांत वैशिष्ट्य आहे. प्राणीही समूह करून रहातांत. माणूसही समूह करून रहातो. हत्ती कळपाने रहातात. सिंह, झेब्रे, हरणे असे अनेक प्राणी कळपाने रहातांत. त्यांना सामाजिक जीवन असते. ॲनिमल सायकॉलॉजीत अशी चित्रे दिलेली आहेत की त्यांच्यामधे माकडे विशेषतः एप्स, चिपँझी, गोरीला ओरँगुटांग हे आपल्या मुलांना खेळायला शिकवतात. (वाघीणी-सिंहिणी आपल्या पिलांना शिकार करायला शिकवतात.) एक चिपँझी मादी होती. तिचे पोर मेले तर ही आपले पोर देईना! आणि मधून-मधून ती रडायची! याला काय म्हणाल? वात्सल्य आहेच ना त्यांना! एखादी बाई रडली काय आणि माकडीण रडली काय फरक काय आहे? त्या माकडीणीला त्यांनी इंजेक्शन देऊन झोपवून ठेवली. झोपल्यावर तिचे ते मेलेले पोर काढून घेतले जागी झाल्यावर मग त्या माकडीणीला त्या पोराचे स्मरण झाले नाही. पण माणसाचे तसे नाही. माणसाला भूत, वर्तमान, भविष्य असे काळाचे भान आहे. महागाई वाढते आहे म्हटले की माणसाला भविष्याची काळजी वाटायला लागते.

प्राण्यांच्या समाजामधे संस्था नाहीत. मानवी समाजाची तीन अंगे आहेत १) पहिले अंग समाज, २) व्यक्ति. प्रत्येक व्यक्तिला व्यक्ती म्हणून महत्त्व आहे. आणि ३) संस्था. त्या संस्था कोणत्या धर्मसंस्था, राज्यसंस्था, व्यापारसंस्था, शिक्षणसंस्था अशा वेगवेगळ्या संस्था आहेत. कुटुंबसंस्था आहे. या संस्था विघटीत होऊ लागल्या म्हणजे प्रश्न निर्माण होतात. कुटुंब संस्थेत मुले ऐकेनाशी झाली, उछृंखल झाली, दारू पिऊ लागली किंवा आणखी काही व्यसन करू लागली, आई-बापांना मारू लागली की, कुटुंबसंस्था विघटीत होते. मनाला ताप होतो त्याने. राज्यसंस्थेचे असेच – आपली सत्ता टिकवण्यासाठी राजकारणी पुरुषानें काय करावे. याला काहीं धरबंधच

राहिलेला नाही. भ्रष्टाचार किती? तुमची इच्छा नसली तरी तुम्हाला जगण्यांसाठी ते करावेच लागते. असे विघटन होऊ लागले की मनाला ताप होतो. परिस्थिती माणसाच्या मनावर आघात केल्याशिवाय रहात नाही. अशा परिस्थितींत तुम्ही घरी बसून नामस्मरण करा म्हणता ते कसें काय शक्य आहे ? आजूबाजूला चोऱ्या-माऱ्या गुंडगिरी इतकी वाढलीय. आपण त्याला काही करू शकत नाही. आपली शासन यंत्रणासुद्धा त्यांना काही करू शकत नाही. आपण पहातो ना? अशा परिस्थितीत 'नामस्मरण करा' हे सांगणे योग्य आहे का? 'आहे!' त्याचे कारण सांगतो आपल्याला. आपल्या ज्या संस्था असतात, त्यांना काही मूल्ये असतांत. ऑब्जेक्टिव्हज् असतात. अध्यात्मसंस्था म्हटली की तिचे एक मूल्य असते. राज्यसंस्था म्हटली की तिचे एक मूल्य असते. या ज्या मानवी संस्था आहेत, त्या सर्व संस्थांत राजकीय संस्थेला जास्त महत्त्व असते. त्याहीपेक्षा अध्यात्मसंस्थेला अतिशय महत्त्व आहे. 'डिग्निटी ऑफ मॅन' असे त्याला म्हणतांत. ज्या समाजांत व्यक्तिला महत्त्व नाही, तेथे निरोगी वातावरण असणे शक्य नाही. जर तुम्ही व्यक्तिला महत्त्व देत असाल तर अशा संस्था कोणत्या. तर राज्यसंस्था. राज्यसंस्थेत व्यक्तिला महत्त्व आहे. आपला पंतप्रधान बघा- काय त्याला महत्त्व असते! पण तो जर भ्रष्ट बुद्धीचा असेल तर देशाचे वाटोळे होते. जसा राजा तशी प्रजा! मग राजा कसा पाहिजे? महाराज म्हणाले 'राजा बैरागी पाहिजे.' बैरागी विरक्त पाहिजे. त्याला स्वार्थ असतां कामाचा नाही. जसा शिवाजी राजा होता. सध्या समाजाची स्थिती पहाताना? नट-नट्या आणि राजकारणी पुरुष यांची जाहिरात जास्त होते आणि समाजांत खरे चांगले निःस्वार्थी, विद्वान यांचा पत्ताच नाही. विज्ञान संस्कृतीने समाजांत धर्माला डावलून शास्त्रज्ञांना महत्व दिले. जर्मनीमधें हिटलरने शास्त्रज्ञांना आपल्या कामाला जुंपले. विनाशकारी अस्त्रांच्या निर्मितीसाठी जुंपले, स्टॅलीनने तेच केले! शास्त्रज्ञांना अतिशय महत्त्व आले त्यामुळे. व्यक्तीचे जे खरे महत्त्व आहे, त्याला ज्याने महत्त्व दिले ते का दिले? हे समजून घेण्यासारखे आहे. व्यक्ति ही आत्मस्वरूप आहे. तो परमात्मस्वरूप आहे. ते परमात्मस्वरूप तुमच्या-आमच्यामधे असल्यानें ते जागे करण्याचा प्रयत्न करण्यांसाठी ही (अध्यात्म) संस्था आहे. मला माझ्या स्वरूपाचे ज्ञान पाहिजे आहे. आणि हे जोपर्यंत नाही, तोपर्यंत माझ्या अंगी दैवी संपत्ती येणार नाही. ते एक्झीस्टेन्शिॲलिस्ट (एक तत्वज्ञानाचा प्रकार मांडणारे तत्त्वज्ञानी) आहेत. ते म्हणतात, "जोपर्यंत माणसाला रिस्पॉन्सिबिलिटी (जबाबदारी) आहे. तोपर्यंत त्याच्या मागे काळजी ही आहेच!" पूर्वी महाराजांच्या वेळी वाहने बेताची असत! इथे गोंदवल्याला यायचे म्हणजे कोण कष्ट असत! कोरेगांवला येऊन येथून मग बैलगाडीनें यावे लागे. १०-१२ तास लागायचे. लोक आले म्हणजे १-२ दिवस राहून परत निघाले म्हणजे महाराज म्हणायचे "तुम्ही इतके कष्ट करून इथे येता पण जे घेऊन जायला पाहिजे ते येथून नेत नाही. तुम्ही तुमच्या काळजीचे गाठोडे रामाच्या पायी ठेवा आणि जा!"आपण काय नेतो इथून? 'गणेश डाळिंबे, कडधान्ये, सध्या काय कलिंगडे स्वस्त मिळतात वाटते इथे!' या अशा वस्तू नेऊन काय करता? प्रथम आपले भय नाहिसे व्हायला पाहिजे.

**"तुम्ही इतके कष्ट करून इथे येता पण जे घेऊन जायला पाहिजे ते येथून नेत नाही. तुम्ही तुमच्या काळजीचे गाठोडे रामाच्या पायी ठेवा आणि जा!"**

१६ व्या अध्यायांत गीता प्रथम अभय हा गुण सांगतेय. अभय – निर्भय नव्हे! निर्भय आधी भय लागलेय, ते नाहीसे करणे. पण अभय म्हणजे भय नाहीच! भय ही काय वस्तू आहे? तिचा पत्ताच नाही म्हणजे अभय! महाराजांचा मनुष्य निर्भय झाला पाहिजे. आण इथे आहोत म्हणून मी महाराज म्हणतोय – तुम्ही ज्या गुरूचे असाल जर तुम्ही गुरुपुत्र किंवा गुरूकन्या असाल, तर आपल्या गुरूच्या जिवावर निर्भय झाले पाहिजे. आपण हे इथे येऊन शिकायचे आहे. 'माझी काळजी दिली तुम्हाला! करा काय करायचे ते तुम्ही!' आणि ते शिकण्यांसाठीं आपल्या जीवनाचा जो घाट आहे तो बदलायला पाहिजे आपण. आज जे आपण जीवन जगतो आहोत ते बदलायला पाहिजे. त्याला बाहेरून काही बदल करायल नको आहे. बदल आतला आहे हा!

जीवनाकडे बघण्याचा आपला जो दृष्टीकोन आहे तो बदलायला पाहिजे. आणि ती दृष्टी काय आहे? त्याचा आपण पांच दिवस काथ्याकूट करणार आहोत. अरे बदलायचे बदलायचे म्हणजे काय बदलायचे आहे? ते आपण पाहूं! कृष्णमूर्ती शेवटी म्हणाले की, 'You don't Change!' यू डोन्ट चेंज असे म्हणणे फार बरोबर आहे. कुटुंबातली सर्व माणसे काही इथे येत नाहीत. आई तरी येते नाहीतर बाप तरी येतो. किंवा आई-बाप येतात तर मुले येत नाहीत. मुले आली तर आई-बाप येत नाहीत. समजा बाप इथे काही वर्षे येतो आहे. तर बायको व मुले म्हणतात – 'तुम्ही इतकी वर्षे गोंदवल्यास जाता. तुमच्यांत फरक काहीच नाही. तुम्ही होतात तसेच आहांत! मग जाऊन उपयोग काय?' त्यांचे म्हणणे बरोबरच आहे. एस.टी.ची भाडी काय वाढलीत! खर्च करायचा, कष्ट करायचे – पदरांत काही पडायला नको का? एकदम बदल होणार नाही. पण थोडातरी बदल व्हायला नको का? आपण समजूनच करीत नाही काय करतो ते! नोकरी चाकरी किंवा जो काही व्यवसाय असेल तो करावा लागेल पण आत्तापर्यंत जी काळजी तळमळ चिंता करीत होतो. "ते जाऊ द्या आता! मी समजून करतोय आतां जे करायचे ते!" असें झाले पाहिजे. काळ फार बदलतोय. परमात्मा काही निजलेला नाही. त्याला नको असेल ते एका क्षणात नाहीसे करील हा भरवंसा ठेवा. हा काळ आपल्याला फार अनुकूल आहे! कसा अनुकूल आहे? सध्या समाजांत कोण काय करतोय? याची पंचाईत कोणी करीत नाही. व्यक्तिने आपल्या खाजगी जीवनांत काय करावे? ते कोणीही तुम्हाला विचारणार नाही. तेव्हा तुम्ही जर नामाचे व्यसन लावून घेतलेत, भगवंताच्या उपासनेचे व्यसन जर लावून घेतलेत तर सरकार काय करणार आहे तुम्हाला? उपासनेचा मोठा आश्रयो। समर्थांनी सांगितलेलेच आहे! तुम्ही जर उपासना करीत राहिलांत तर व्यवहारांत तुमचे अपमान होतील. खालची माणसे वर जातील पण तुमचे समाधान ढळणार नाही. आणि मनच शांत-समाधानी राहिल्यावर मग बाकीच्या परिस्थितीचे भान राहिले काय आणि नाही राहिले काय! नंतर त्या परिस्थितीचा मनावर परिणामच होणार नाही. आणि ते कसे शिकायचे याचा आपण पांच दिवस विचार करूं !

**मनच शांत-समाधानी राहिल्यावर मग बाकीच्या परिस्थितीचे भान राहिले काय आणि नाही राहिले काय! नंतर त्या परिस्थितीचा मनावर परिणामच होणार नाही.**

**। जानकी जीवन स्मरण जय जय राम ।**




**मालाड येथे पू. बाबांनी केलेले मार्गदर्शन**

दरवर्षी श्रीमहाराजांच्या उत्सवाला, गुरुपौर्णिमेला मालाडला जायचं, आणि वर्षभरासाठी तो आनंद मनात साठवून ठेवायचा, हा उपक्रम कित्येक वर्षे चालू होता. सर्वांनाच केतकर कुटुंबिय अतिशय प्रेमाने प्रसादाला आमंत्रित करीत. निर्मला वाहिनी आईच्या मायेन प्रसाद देत. गुरुपौर्णिमेला पादुकांचे पूजन झाल्यावर, सर्व मंडळी शेजारी श्री दादा बेलसरे यांचे घरी जात. तिथे शोभनावहिनी व इतरांचे अगत्य अनुभवून घरी जात... या आठवणीबरोबर आज मनात पूज्य बाबा बेलसरे यांच्याबद्दल असीम कृतज्ञता दाटून आली. सारखे डोळे भरून येऊ लागले. सर्व माणसांना निरपेक्ष प्रेमाने जीवनात समाधान देण्याचे फार मोठे कार्य पूज्य बाबांनी केले. अगदी सहज बोलता बोलता ते कसं जगावं याबद्दल छान मार्गदर्शन करीत.

१ – प्रत्येक माणसाचं मन हा विश्वमनाचा अंश आहे (ईश्वराच्या मनाचा अंश) आहे म्हणून कोणाचेही मन कधी दुखवू नये. कठोर शब्द बोलण्याने अथवा अहित चिंतण्याने मन दुखावले जाते. आपण हे टाळलेच पाहिजे. थट्टेत देखील आपण या विषयी जागरूक राहिले पाहिजे ,कोणाच्याही वैगुण्याची चेष्टा करू नये. आपल्या पूर्व जन्मातील कर्माच्या देवाण घेवाणीमुळे कुटुंबात नाते संबंध तयार होतात. एकाच आईची मुले आपसात वैर भावाने वागतात. नातं अगदी जवळचं असलं तरी या व्यक्ती आपल्या हितचिंतकच असतील असे नाही. काही कुटुंबात आपसात खूप प्रेम दिसते, याचे ही कारण कर्माची देव घेव हेच आहे. समर्थांची, दासबोधात एक ओवी आहे.
कर्मयोगे सकळ मिळाली, येके स्थळी जन्मा आली, ते तुवा आपुली मानली, कैसी रे पढतमूर्खा॥
–एकाच ठिकाणी जन्माला आलेल्या माणसांना तू आपली माणसं मानू नकोस. फक्त आपले सद्गुरू आपले आहेत बरं.

२. आपल्या नातेसंबंधात आपल्याला मानसिक क्लेश होत असतील, तर ते नाते संपवून टाकावे यात फार विचार करू नये. समर्थांची ओवी आहे. जयासी वाटे सुखची असावे, तेणे रघुनाथ भजनी लागावे, स्वजन सकळहि त्यागावे दुखः मूळ जे। अशावेळी कोण काय म्हणेल याचे दडपण घेऊ नये

३. पूज्य बाबां ज्ञानेश्वरीतील एक ओवी नेहमी सांगत. या ओवीत जीवनाचे सार सांगितले आहे, कसे ते पहा–

माळिये जेउते नेले। तेउते निवांतचि गेले। तया पाणिया ऐसे केले। होआवे गा॥

जग हे एक उद्यान आहे, उद्यानात झाडे व्यवस्थित लावली असतात, तशी या जगात एक व्यवस्था

आहे. ईश्वर हा उद्यानातील झाडांना पाणी घालणारा माळी आहे, माळी ज्या झाडाकडे नेईल, त्या झाडाकडे पाणी विनातक्रार जाते, तसे आपले जीवन विनातक्रार असावे. ही ओवी आपल्याला प्रतिकूल परिस्थितीचा स्वीकार करायला शिकविते. मला नक्की माहीत आहे, सध्याच्या कोरोंना सारख्या प्रतिकूल परिस्थितीत, ज्यांनी पूज्य बेलसरे यांची निरूपणे ऐकली आहेत, त्यांनी आनंदाने या दिवसांचाही स्वीकार केला आहे . पूज्य बेलसरे यांना मनापासून नमस्कार .

**४. ईश्वर दर्शन म्हणजे नक्की काय ?**

मालाडला श्री गोंदवलेकर महाराजांच्या मठात पूज्य बाबा बेलसरे यांच्या निरुपणामुळे उपासना व त्याचे महत्व थोडेसे समजले तरी मनात अनेक शंका येत. सर्व संत सांगतात, मानवी जन्माचे ध्येय आत्म दर्शन अथवा ईश्वर दर्शन आहे. म्हणजे नक्की काय? हा प्रश्न माझ्या मनात अनेक वेळा येत असे. एकदा कबिराचा एक दोहा वाचनात आला, त्याचा अर्थ पूज्य बाबांना विचारावा असे वाटले. हा दोहा अनेकांना ठाऊक आहे;

गुरु गोविंद दोऊ खडे काके लागू पाव। बलिहारी गुरुदेव की गोविंद दियो बताय॥ ...

या दोह्याचा अर्थ व गोविंद दियो बताय। म्हणजे काय असे विचारल्यानंतर पूज्य बेलसरे म्हणाले, गुरु आणि देव शेजारी उभे आहेत आधी कोणाला नमस्कार करावा हा विचार मनात आला त्या वेळी आधी गुरूला वंदन करावं अस वाटलं, कारण ईश्वर दर्शन गुरुमुळे घडलं. आता, ईश्वर दर्शन म्हणजे नक्की काय? मी विचारलं,"म्हणजे राम, कृष्ण, महादेव स्वप्नात येतात का?" त्यावर ते म्हणाले, "ईश्वर दर्शन म्हणजे आपल्या उपास्य देवता दिसतात, ही सर्व सामान्य माणसांची समजूत चुकीची आहे. हरी पाठात ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, संतांचे संगती मनोमार्ग गती आकळावा श्रीपती येणे पंथे॥, म्हणजे ईश्वराला भेटण्याचा मार्ग मनातून आहे. आपल्या मनातील षड्रिपू निघून गेल्याखेरीज मनाचा मार्ग स्वच्छ होणार नाही. षड्रिपू म्हणजे काम, क्रोध, मत्सर असे विकार. हे विकार गेल्यानंतर मन म्हणजे फक्त शुद्ध चैतन्य, अथवा शुद्ध जाणीव याने व्यापलेले असते आणि हेच ईश्वर दर्शन. हीच अखंड आनंदाची अवस्था. भामचंद्र डोंगराच्या गुहेत विंचू सापाच्या वस्तीत नामजप साधना करणाऱ्या तुकारामांनी या अवस्थेच वर्णन, आनंदाचे डोही आनंदतरंग असे केले आहे. विंचू साप आजूबाजूला फिरत पण तुकारामांना त्यांनी इजा केली नाही. या बद्दल तुकाराम म्हणतात, चित्त शुद्ध तरी शत्रू मित्र होती। व्याघ्र हे न खाती सर्प तया। तुकारामांची शुद्ध जाणीव आणि निसर्गातील शुद्ध जाणीव एकरूप झाल्यामुळे आपसात वैरभाव निर्माण झाला नाही. श्रीगोंदवलेकर महाराज निमिषारण्यात साधनेसाठी गेले त्यावेळी त्यांच्या वाटेत आलेले विषारी नाग बाजूला होऊन त्यांना वाट करून देत. चित्तशुद्धी करण्याच सामर्थ्य फक्त गुरूमध्येच आहे. चित्त शुद्धीशिवाय शुद्ध जाणिवेचा अथवा शुद्ध चैतन्याचा म्हणजेच ईश्वर दर्शनाचा अनुभव येणे शक्य नाही. आपल्याला हा अनुभव हवा असेल, शाश्वत आनंद हवा असेल, तर आपल्या मनाकडे आपण वेगळेपणाने पहावे. आपल्या मनातील दोष काढून टाकण्याचा अभ्यास करावा... पुन्हा मी विचारले, "असे जर आहे तर मूर्तीपूजेच काय महत्व आहे?" त्यावर ते म्हणाले "मूर्तीपूजेमुळे चित्त शुद्धी होण्यास मदत होते. उपासनेची ही पहिली पायरी आहे. ही सगुण उपासना आहे. आपल्याकडील अनेक संतांनी सगुणोपासनेकडून निर्गुण उपासनेकडे प्रगति केली, व ते पूर्णत्वाला पोचले." पुन्हा मी विचारलं, "निर्गुण उपासना म्हणजे काय?" त्यावर ते म्हणाले, "दृश्य जगातील अणू रेणूत ईश्वराची अनुभूती येण ही निर्गुण उपासना. आपल्या मनात नेहमी ही जाणीव हवी. निसर्गात, सर्व प्राणिमात्रात, सर्व माणसात एकच चैतन्य व्यापलेले आहे आणि तोच ईश्वर आहे. समर्थांची एक ओवी आहे. पृथ्वीमध्यें जितुकी शरीरे। तितुकी भगवंताची घरे।" या ओवीचा मला फार उपयोग झाला. काही माणस उगीचच आपला अपमान करतात, अन्यायाने वागतात, त्यावेळी

ही ओवी मी आठवत असे, मनात येई... जाऊ दे, तो मुद्दाम अपमान करीत नाही, त्याच्या मनावर अज्ञानाचे आवरण आहे, तो पू. बाबांना एकदा तरी भेटला असता तरी त्याला आपली चूक कळली असती, आपली क्रोधाची धार खूप कमी होते आहे हे लक्षात आल्यावर जगण्यातला आनंद वाढला.

**५. मृत्युचे दु:ख करू नका...**

जीवनात आपल्याला नक्की काय हवं असतं, याचा विचार केला तर माणसाला निर्मळ, निरपेक्ष प्रेम हवं असतं. त्यात जो आनंद आहे तो कोणत्याही भौतिक सुखात नाही, हे लक्षात आल्यावर आपल्यावर खूप प्रेम करणारी व्यक्ती कायम आपल्याबरोबर असावी असे प्रत्येकाला वाटते. माझ्या आईच्या बाबतीत, ती कधी ना कधी आपल्याला दुरावणार आहे, या कल्पनेने देखील माझे डोळे धो धो भरून येत. तिचा जीवन प्रवास संपत आला त्या वेळी कॅन्सरने ती पूर्व सूचना दिली. मी वैद्यकीय क्षेत्रात असल्यामुळे, अनेक डॉक्टरांची खूप मदत होती. त्यात डॉ. विकास आणि डॉ. चारुता खूप धडपडत होते. उत्पत्ति, स्थिती, लय हे निसर्गाचे चक्र आहे, त्यामुळे कॅन्सर हे निमित्त आहे, हे बुद्धीला समजत होते, परंतु मन मात्र तयार नव्हते. घरात सर्व कुटुंबियांसमोर, सारखे उदास राहणे व रडणे योग्य नव्हते. एक दिवस मनावरचा ताण अगदी असह्य झाला. पूज्य बाबा बेलसरे यांचेकडे गेले. त्यांना पाहून मनाचा बांध फुटला. माझं रडण संपल्यावर, त्यांनी विचारलं: "मनाला एवढे क्लेश का झाले?" "मी म्हटलं, "आई सीरियस आहे. केव्हा... सांगता येत नाही, असं डॉक्टर म्हणाले आहेत," काही क्षण शांततेत गेले, पुढे त्यांनी मला जे सांगितलं, ते ऐकून मी आईच्या निर्वाणाचं दु:ख करायचं नाही हा निर्धार केला. ते म्हणाले, "कॅन्सरमुळे आईना खूप यातना होत असतील ना?" मी म्हटलं "हो ना, पाहवत नाही हो. तिच्या यातना कशा कमी होतील? मी वाटेल ते कष्ट घेईन, काहीही करीन, माझी आई मला हवीच आहे."

त्यांनी दुसरा प्रश्न विचारला, "तुमचं आईवर खूप प्रेम आहे ना?" मी मान हलवली, पुढे ते म्हणाले, "तुमचं आईवर प्रेम असेल तर तिला आता जाऊ दे. श्रीमहाराजांना तशी प्रार्थना करा, आईला घेऊन जा अस सांगा. आता मी काय सांगतो ते नीट ऐका, तुमच्या आईबद्दल तुम्हाला जे वाटतं, ती आसक्ती आहे, तुमची आई तुमच्या मनाचे लाड करण्यासाठी तुम्हाला हवी आहे. तू किती काम करतेस, तू दमलीस ग! हे लाड तिच्यशिवाय कोण करणार, तुमचं प्रेम आहे ना? मग ती लौकर गेली तर तिची या यातनातून लौकर सुटका होईल, म्हणून तुम्हाला समाधान वाटलं पाहिजे. दुसरं म्हणजे माणूस गेल्यानंतर आपण खूप दु:ख केलं तर त्याचा पुढचा प्रवास चालू होत नाही. तसं पहायला गेल तर कोणाचही निधन झाल्यावर शोक करू नये. प्रत्येकाचं इथलं वास्तव्य किती हे नियतीन ठरवलेले आहे. आता शांतपणे घरी जा, आईची आसक्ती सोडून द्या" या वेळी जीवाचा पुढचा प्रवास कसा असतो याबद्दल जाणून घेण्यात मला काही स्वारस्य नव्हतं. आता डोळ्यात पाणी येऊ द्यायचं नाही, हा विचार मात्र मनात पक्का केला. सूक्ष्म शास्त्र आपल्याला कळत नाही, पू. बाबा सांगतील तसं करायचं अस ठरवलं. अपेक्षेप्रमाणे, पुढे दोन दिवसातच तिचं निधन झालं. परगावाहून काही लोक येणार होते, तोपर्यंत तिचा देह घरीच ठेवला होता. मी आणि माझी मुलगी डॉ. विनीता तिच्याजवळ बसून श्रीमहाराजांना आवडणारे राम नाम घेत बसलो. डोळ्यात अश्रुचा थेंब नव्हता. त्यामुळे घरी येणारी माणसं देखील थोडावेळ राम नाम घेत. वातावरण गंभीर होते, पण पवित्र होते. कोणी उगीच तिच्या आठवणी काढून अश्रुपात करीत नव्हते. ती गेली तरी तिचं प्रेम माझ्यासोबत सतत आहे, याची मात्र मला अगदी शंभर टक्के खात्री आहे.

**माधवी कवीश्वर (गोरेगाव मुंबई)**




## उपासकांसी सूचना
# उपासना
# उपासना

'**उपासना**' म्हणजे –'**उप**' म्हणजे 'जवळ' किंवा 'च्या सानिध्यात' आणि '**आसन**'– बसणे, मनाने स्थिर होणे...याचा अर्थ स्पष्ट आहे की, एखाद्या विषयाच्या अनुसंधानात प्रदीर्घकाळ मनोभावे स्थिर असणे म्हणजे उपासना! असे जर आहे तर आपल्याला ही उपासना काही नवी नाही. ह्या दृष्टीने पाहता, पशू–पक्ष्यांनाही ती अवगत आहे. कशी ते पाहू...

पशू–पक्षी हे सतत अन्नपाण्याच्या शोधात असतात, निवाऱ्याच्या शोधात असतात, वैषयिक सुखासाठी लालायित असतात. या सर्वालाच शास्त्रीय नाव आहे "संसार"! म्हणजे ते मनोयोगाने सतत त्याच अनुसंधानात असतात. म्हणजेच ते एक प्रकारे संसाराची अत्यंत आवडीने उपासनाच करत असतात. असे म्हटले तर ते मूळ व्याख्येच्या विपरीत होणार नाही. हे जसे; त्याचप्रमाणे तुम्ही आम्ही मानवसुद्धा थोड्या वेगळ्या पद्धतीने का असेना पण अन्नपाणी, निवारा, वैषयिक सुख यांच्याच प्राप्तीसाठी धडपडत असतो आणि बऱ्याच वेळा ते मिळवताना धडपडतोही! त्यादृष्टीने पाहिल्यास आपणही या पशुपक्ष्यांसारखे संसारोपासकच आहोत. म्हणूनच श्रीसमर्थांसारखे सत्पुरुष आपल्या या उपासनेचे वर्णन करताना म्हणतात —

**रवी ऊदयो अस्त तो पोटधंदा। स्तवी आर्जवीतो करी येर मिंधा॥**
**कळेना कसा काळ जातो वृथा रे। हरे राम हा मंत्र सोपा जपा रे॥**

थोडे अधिक खुलासा करून सांगायचे तर बालपणी क्रीडोपासना, तरुणपणी प्रणयोपासना व विषयोपासना, प्रौढपणी द्रव्योपासना, वृद्धपणी चिंतोपासना (भय व चिंता यांची उपासना – सतत चिंतामग्न राहणे या अर्थाने) आणि संपूर्ण आयुष्यभर *खाद्योपासना* (चटकदार आहाराच्या प्राप्तीसाठी चिंतन, प्रयत्न व उपभोग) करीतच असतो, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

याचा अर्थ, मनुष्ययोनी प्राप्त करून सुद्धा पशुपक्ष्यांपेक्षा आपल्या अभीप्सा फारश्या भिन्न नाहीत हेच सिद्ध होते ना? त्याहीपेक्षा; आपल्या तीव्र बुद्धीचा उपयोग करून, मनुष्य या पशुपक्ष्यांपेक्षाही अधिक **भोगी** (utilitarian) बनला आहे हेच खरे. म्हणून श्रीसमर्थ माणसाला अंतर्मुख करण्यासाठी असा प्रश्न विचारतात – शत वरुषे वय नेमिले। त्यात बालपण खेळण्यात गेले॥ तारुण्य सर्वही वेचले। विषयांकडे॥ वृद्धपणी नाना रोग। भोगणे लागे कर्मभोग॥ **आता भगवंताचा योग। कोणे वेळे?॥**

अगदी किडा–मुंगीपासून ते ब्रह्मदेवापर्यंत सर्वच जण सुखासाठी धडपडत असतात. पण संसारातून सुख मिळवण्याचा प्रयत्न करणार्या प्रत्येकाचा डोळस अनुभव असाच की– सुख पाहता जवापाडे। दुःख पर्वतायेवढे॥ कारण, नव्हे सार, "**संसार हा घोर आहे**"! एखादे विष गोड लागते म्हणून प्यायले तर गोडपणामुळे वाटणारा आनंद किती काळ टिकून राहणार? मधुर विष पिण्याचे (संसाराचे) जवापाडे सुख अनुभवतो न अनुभवतो, तोच पर्वतायेवढ्या दुःखास सामोरे जावेच लागणार हे स्पष्टच आहे ना? मग उपाय काय? तर – **करी रे मना ध्यान या राघवाचे!** कारण एका

सच्चिदानंद भगवानाकडेच केवळ निर्भेळ (दुःखाची भेसळ नसलेले), अखंड, अक्षर (कमी वा नष्ट न होणारे) सुख आहे. पण त्या पुरुषोत्तमाचे ध्यान करण्यासाठी काही मानसिक बैठक तयार हवी ना? ती तयार करण्यासाठीच **ईश्वरोपासना** परमावश्यक आहे!

एखादी नवी गोष्ट करायची म्हटले की मन पटकन उचल घेत नाही. पण पूर्वीच सिद्ध केल्याप्रमाणे आपणास उपासनेचा प्रदीर्घ **अभ्यास व आवडही** आहेच! आता फक्त तिचा विषय बदलायचा इतकेच! संसार (पूर्ण वेळ नाही जमला तरी काही काळापुरता तरी ✻मनातून✻) बाजूला काढून तेथे भगवान् प्रस्थापित करायचे, इतकेच! नक्की जमणार, करून तरी पहा.

**सामुदायिक उपासनेमध्ये तुमची सामूहिक चेतना (collective conscience) खूप उन्नत होते व ती संपूर्ण उन्नत सामूहिक चेतना प्रत्येक उपासकास एकदम मिळते.**

ईश्वरोपासना दोन प्रकारे करणे आवश्यक आहे. —

१. **वैयक्तिक:** आत्मोन्नयनासाठी प्रत्यही (रोज), घरी सव्वा तास सलग अथवा टप्प्याटप्प्याने. एकांताचा अभ्यास वाढवावा. जप-ध्यान, ग्रंथवाचन, स्तोत्रपाठ, पूजा इ. करावे.

२. **सामुदायिक** : सङ्घे शक्तिः कलौ युगे - प्राप्त घोर कलियुगात संघशक्तीला अपरिमित महत्त्व आहे. सध्याच्या काळात लोकांमध्ये पूर्वीच्या लोकांप्रमाणे सत्य, तप, पावित्र्य, व्रत, इ.चे प्रचंड बळ शिल्लक नाही. तेव्हा व्यक्तिगत उपासनेला अधूनमधून पण सातत्याने (continually, if not continuously) सामुदायिक उपासनेची जोड देणे हे साधकाला आवश्यक आहे. तिची वारंवारता (frequency) अधिक असल्यास उत्तम! **कमीत कमी मासिक उपासना एकदा तरी करावीच.** सामुदायिक उपासनेमध्ये तुमची सामूहिक चेतना (collective conscience) खूप उन्नत होते व ती संपूर्ण उन्नत सामूहिक चेतना प्रत्येक उपासकास एकदम मिळते. म्हणजे त्याचा केवढा मोठा लाभ होतो पहा! यात कथा-कीर्तन-प्रवचन श्रवणही अगत्याचे आहे. तसेच जर यात सामूहिक नाम-जप, नाम-संकीर्तन व भजन, इ. अंतर्भूत केले तर तो एक दुग्ध-शर्करा योगच म्हणायचा!

असो!... ही गोष्ट पटते का पहा... कोणत्याच पालकास आपला पाल्य एका वर्षासाठीसुद्धा पुढच्या वर्गात न जाता त्याच वर्गात राहिलेला आवडणे शक्य नाही. मग या जगाचे पालक, माय-बाप असणार्या संतांना तुमच्या आमच्यासारखे पाल्य; मनुष्य म्हणून जन्माला आल्यापासून आजपर्यंत, एक नव्हे तर अनेक वर्षे त्याच प्रपंचाच्या वर्गात बसून आहेत, पुढच्या परमार्थाच्या वर्गात काही केल्या जाता जात नाहीत हे पाहून काय वाटत असेल? असो! या लेखन प्रपंचाचा सारांश -

**उपासनेचा मोठा आश्रयो। उपासनेविण निराश्रयो॥ उदंड केले तरी तो जयो। प्राप्त नाही॥**

इति लेखनसीमा।

॥जय जय रघुवीर समर्थ॥

**श्री अजेय बुवा रामदासी**

स्मृती सुमने

# श्री मुकुंद काळे



**८० च्या दशकात गोंदवले येथे पौर्णिमा व उत्सव यासाठी येणाऱ्या भक्त मंडळींची संख्या बरीच वाढू लागली. त्यावेळचे विश्वस्त श्री अण्णासाहेब गाडगीळ, श्री बापूकाका दामले यांनी त्यादृष्टीने उत्सव काळात वेगवेगळ्या विभागांच्या सेवेकऱ्यांच्या टीम तयार केल्या. स्वयंपाक घरात श्री रामदास काका यांच्या टीम मध्ये असणाऱ्या उत्साही तरुण मंडळींमध्ये श्री मुकुंद काळे यांचा समावेश होता. श्रीमहाराजांच्या कृपेने ३५-४० वर्ष सातत्याने सेवा करण्याचे भाग्य त्याना लाभले. त्यांचे सुपुत्र म्हणजे श्री महेश काळे व दुसरा सुपुत्र मंदार याची पत्नी म्हणजे त्यांच्या सूनबाई सौ. मुक्ता काळे यांनी त्यांच्या आठवणी शब्दबद्ध केल्या आहेत.**

माझे वडील म्हणजे श्री मुकुंद काळे यांची श्रीमहाराजांबद्दल अतीव निष्ठा होती. आमच्या परिवारावर त्यांचं प्रेम होतं तितकच किंवा किंबहुना त्यापेक्षा काकणभर जास्तच प्रेम व श्रद्धा त्यांची महाराजांवर होती. तेच संस्कार आमच्यावर झाले. माझे वडील महाराष्ट्र बँकेत महाप्रबंधक या मोठ्या पदावर कार्यरत असूनही त्यांना कोठीघरातील श्रीमहाराजांचा सेवेकरी या उपाधीनेच समाधान मिळत असे.

वडिलांच्या या प्रेमाखातर आम्हाला गोंदवल्यातील वास्तव्य व श्रीमहाराजांच्या अस्तित्वाचा सहवास भरपूर घडला. जीवनात कोणतीही चांगली वाईट गोष्ट झाली तर ती आधी गोंदवल्यास श्रीमहाराजांच्या कानावर घालावी अशी ओढ त्यांना असायची. वडिलांना प्रमोशन मिळाले किंवा कुठलाही विशेष आनंदाचा प्रसंग घडला तर पहिल्यांदा श्रीमहाराजांना सांगायला ते जात असत. वास्तविक श्रीमहाराजांनी ते घडवून आणले अशीच आमची श्रद्धा, तरीही घडलेल्या प्रसंगाची नोंद त्याची पोच पावती देण्यास ते गोंदवल्याला आवर्जून जात असत.

# श्री मुकुंद काळे

आमच्या परिवारावर कुटुंबीयावर महाराजांनी कायमच कृपाछत्र धरले होते. कठीण प्रसंगी त्यांच्याच मनाला आधार कायम मिळत आला आहे. त्याची जाणीव माझ्या वडिलांच्या शेवटच्या दिवसातही झाली. कोरोना साथीच्या काळामध्ये वडील हॉस्पिटल मध्ये admit असतानाच हॉस्पिटल मध्ये श्रींचा प्रसाद आणि तीर्थ आले. श्रीमहाराजांचा प्रसाद हाच त्यांच्या देहाने केलेले अंतिम अन्नग्रहण तर तीर्थ हेच शेवटचे ग्रहण केलेले पाणी ठरले. त्यांच्या देहाची रक्षा व अस्थी माणगंगेतच विसर्जित केल्या आणि माझे वडील श्रीमहाराजांच्या चरणी कायमचे विसावले.

महाराजांची माणसं आम्हाला आमचीच वाटतात. म्हणून अगदी व्यक्तिगत आठवण सांगायला हरकत नाही. माझ्या बाबांच्या शेवटच्या आजारात त्यांच्या जाण्याआधी मी व माझा भाऊ गोंदवल्यात येऊन महाराजांच्या पायावर डोकं ठेऊन अश्रूतून व्यक्त झालो. त्यांची प्रार्थना करून परत आलो आणि ते जायच्या रात्री बाबांनीच शिकवलेला पहिला अभंग त्यांच्या कानाशी शेवटचा म्हणालो. या कठीण प्रसंगी श्रीधरकाका, पाठककाका इ सर्व विश्वस्त मंडळींचा आधार होताच. अगदी बाबांच्या देहवसनानंतर देहाचे अवशेष माणगंगेत समर्पण करायला आलो होतो तेव्हाही श्रीमहाराजांच अस्तित्व जाणवलं. समाधीवरचा हार व तुळस बरोबर घेऊनच अस्थी विसर्जित झाल्या.

**महेश काळे**



समाधी मंदिरातील कीर्तन सेवा – कीर्तनकाराच्या वेशात आणि आवेशात श्री मुकुंद काळे

# श्री मुकुंद काळे

मनोहर काकांनी जेव्हा माझे सासरे कै. मुकुंद काळे यांच्या आठवणी लिहिण्यास सांगितल्या तेव्हा नक्की काय काय लिहायचे हा प्रश्न पडला. माझा व त्यांचा सहवास २२ वर्षांचा. मी त्यांना लग्न झाल्यापासून बाबा म्हणत आले आहे. माझे लग्न १९९९ मध्ये झाले. त्यावेळेस माझ्या सासूबाई मीनल काळे या स्वतः काही करू शकत नसल्याने घरातील बऱ्यापैकी जबाबदारी बाबा घेत होते. बाबा बँकेत मोठे अधिकारी, त्यांचा स्वभाव कडूक व शिस्तशीर. त्यामुळे हाताखालील माणसेही त्यांना घाबरून असायची. परंतु बाहेरून कितीही तापट दिसत असले तरीही मनाने ते अतिशय प्रेमळ होते. माझ्यासोबत कधीच ते रागात बोलले वागले नाहीत. २२ वर्षाच्या सहवासात फक्त एकदाच आमच्या दोघांमध्ये मतभेद झाले.



महाराजांच्या गप्पा गोष्टीत दंग

त्यांना घरात सर्व गोष्टी व्यवस्थित व टापटीप लागत. त्यांची स्वतःची खोली, कपाट अतिशय व्यवस्थित लावलेले असायचे. कपड्यांची त्यांना अतिशय आवड. कपडे खरेदी मग ती कोणासाठीही असो ते त्यासाठी एका पायावर तयार असायचे. नोकरीनिमित्त फिरतीवर असताना ते मला, पूर्वाला ड्रेस, साड्या आणत असतं. महेशकडे अमेरिकेला गेल्यावर परत येताना ते त्यांचा ड्रायव्हर विकास सकट सगळ्यांना कपडे आणायचे. खाण्याची त्यांना अतिशय आवड. रोजचे मी बनवलेले साधे जेवणही ते आवडीने जेवायचे आणि सगळ्यांकडे माझ्या स्वयंपाकाची स्तुती करायचे. गोंदवले येथे मोठ्या प्रमाणात स्वयंपाक करण्याची त्यांना सवय, परंतु घरी असताना मात्र त्यांना मी केलेले जेवण लागायचे. पुरणपोळी, लाडू,कोथिंबीर वडी, अळू वडी, अळूची भाजी, वाटली डाळ, चकली, बटाटे वडे हे पदार्थ त्यांच्या अतिशय आवडीचे.

बाबा श्री महाराजांचे निस्सीम भक्त. त्यांच्या हातात सतत जपमाळ असायची व जप चालू असायचा. त्यांच्या शेवटच्या आजारपणात हातात माळ नसली तरी बोटे मात्र हातात माळ धरल्या प्रमाणे असायची. दर गुरुवारी संध्याकाळी श्री महाराजांच्या आरती साठी ते स्वतः जाऊन फुले आणून हार करत. घरात प्रत्येक सणाला हार करण्यासाठी ते उत्साहाने मार्केट यार्ड मध्ये जाऊन फुले आणत. माझ्या आठवणीत श्रीमहाराजांची पुण्यातील काकड आरती, गोंदवले येथील श्री महाराजांचा पुण्यतिथी उत्सव यासाठी बाबा कायम जायचे. कधी कधी शनिवारी रात्री झोपायला उशीर झाला तरी पहाटे पाच वाजता बाबा काकड आरतीला जाणार हे नक्की असायचे.

घरात मंदार, महेश, माझा मुलगा मिहिर यांना वेळप्रसंगी बाबा रागवायचे परंतु त्यांच्यावर

## श्री मुकुंद काळे



पुण्यतिथी उत्सवाच्या पहिल्या दिवशी कोठी पूजनाची सजावट दाखवण्यासाठी पू. बाबांना घेऊन जाताना

प्रेमही तितकेच करायचे. नातेवाईक,ओळखीचे लोक, मित्रमंडळी यांनी घरी बोलावणे, त्यांचा यथायोग्य पाहुणचार करणे हे ही त्यांना आवडायचे. लोकांना जोडण्याची कला त्यांना अवगत होती. त्यांच्या शेवटच्या आजारपणात त्यांची चार महिने काळजी घेणारा दीपक हा ही ते गेल्यावर रडला व 'बाबांसारखा तापट परंतु तितकाच प्रेमळ पेशंट पहिल्यांदाच पाहिला' असे म्हणाला.

बाबा जाऊन आता अडीच वर्ष होत आली परंतु त्यांची उणीव अजूनही जाणवते. ते महेशकडे अमेरिकेला गेले आहेत लवकरच परत येतील असे वाटत रहाते. बाबांसोबतच्या आठवणी असंख्य आहेत. काही थोडक्या आठवणी मांडण्याचा प्रयत्न मी केला आहे.

**मुक्ता काळे**

---

काव्य सुमने



## चला गुरु गुण गाया

**श्रीमती वर्षा फडके ठाणे**

आले सद्गुरूराया, रामनामाचा रंग लुटाया
नामात रंगून, भक्तीत न्हाऊन, चला गुरुगूण गाया ॥ध्रु॥

गुरुमाऊलीच्या प्रेमाची हो, असे घरावर छाया
कल्पतरूहून असे आगळी, सुचेना उपमा द्याया
रामनाम घेऊन, फेरात नाचून, चला गुरुगूण गाया॥

नामजपा च्या सामर्थ्याने, दूर पळे ही माया
उत्सुक झाले, पहा सद्गुरू, अढळ पदी तुज न्याया
काम दूर सारून, चिंतेला मारून, चला गुरुगूण गाया

करा करा संकल्प जपाचा, झिजवू आपुली काया
भवडोहातून काढून सत्वर, येईल प्रभू तुज न्याया
रामडोळा पाहून, जाऊ भव तरुन, चला गुरुगुण गाया॥

गुरुरायाची ही अशी सेवा, जाईल का कधी वाया?
सौख्याचा तो ठेवा लाभे, नको कुठे दूर जाया
रामरूप होऊन, जाऊ भव तरुन, चला गुरुगूण गाया
आले सद्गुरूराया, रामनामाचा रंग लुटाया ॥



## श्री. माधव नरहर देवकुळे, म्हणजेच सर्वांचे आबा देवकुळे

श्रींचरणी एक समर्पित सेवेकरी

आबा देवकुळे यांचा जन्म बारा डिसेंबर १९२८ रोजी पुण्यात झाला. लहानपण पुण्यातच गेले, शालेय शिक्षणही पुण्यातच झाले. बालवयात असताना त्यांचा शांत स्वभाव, प्रेमळ, विश्वासू आणि मनमिळाऊ होता. अर्थात असे आबा हे सर्वांचे प्रिय होते. त्यांच्यातील एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे कुठलेही काम करताना विचारपूर्वक, शांतपणे व पूर्वनियोजन करुनच करीत असत. त्यामुळे सर्व कुटुंबात आणि नातेवाईंकामध्ये एखाद्या कठीण प्रसंगात किंवा कुठल्याही कार्यात प्रथम आठवण यायची ती आबांचीच. कार्य निर्विघ्नपणे पूर्ण होण्यासाठी ते आबांवर सोपवले जात असे. आणि आबा ते लीलया पार पाडत असत. बालपण आणि एस. एस. सी. पर्यंत शिक्षण पूर्ण झाले. त्यावेळच्या परिस्थितीनुसार ११ वी पास झाल्यावर लगेच नोकरीचा शोध घेतला जात असे. घरची आर्थिक परिस्थिती जरा बेताचीच असल्यामुळे आबांनी नोकरी शोधण्यास सुरुवात केली. सेंट्रल गव्हर्नमेंटची डिव्हीजनल अकाऊंटची परीक्षा ते पहिल्या नंबराने पास झाले. पी. डब्ल्यू. डी. मध्ये त्यांना नोकरी लागली.

सरकारी नोकरी असल्यामुळे फिरतीची असे. संसार एका जागी स्थिर न राहता सतत या गावाहून त्या गावी जावे लागे. त्यातून होणाऱ्या त्रासाची झळ त्यांनी आपल्या कुटुंबाला कधीही जाणवू दिली नाही. अतिशय शिस्तबद्ध व काटकसरीत दिवस काढून आपल्या कुटुंबासह आपल्या भावंडांनाही आपल्या पायावर उभे करण्यात निरलसपणे सहकार्य केले. मूळच्या स्वभावाप्रमाणे सहजपणे इतरांना मदत करणे हा त्याचा धर्म होता.

या बदलीच्या काळात त्यांची बदली नाशिक जवळील वैतरणा धरण येथे झाली. येथील वास्तव्यात त्यांनी आपल्या ऑफिसमधील गरजेच्या काळात शिपायांपासून इंजिनिअरपर्यंत अनेकांना नोकऱ्या मिळवून दिल्या आणि समाजाचे ऋण फेडण्याचे कार्य त्यांच्या हातून होण्यास सुरुवात झाली.

सन १९७७ साली आम्हा सर्व कुटुंबियांना घेऊन ते श्रीक्षेत्र गोंदवले येथे दर्शनासाठी आले होते. त्यांनतर ते गोंदवले येथे अनेक कार्यक्रमांसाठी येणे जाणे सुरु झाले. जणू काही चुंबकाप्रमाणे ते श्रीक्षेत्र गोंदवल्याकडे खेचले जात असत. त्यांना श्रीगोंदवलेकर महाराजांची ओढ लागली. याच काळात पुण्यातील आरती मंडळात ते आरती, जप, भजन यासाठी जाऊ लागले. आध्यात्मिक

क्षेत्रातील त्यांची गोडी वाढीस लागली. त्यामुळे गोंदवले येथे पौर्णिमा आणि गुलाल या कार्यक्रमांसाठी ते उपस्थित राहू लागले. त्यावेळेस तेथील विश्वस्त श्री. बापूसाहेब दामले जे सांगतील ते काम शिरसावंद्य मानून ते करीत असत.

असेच एकदा घरी जप करीत असताना त्यांना आतून प्रेरणा झाली (आज्ञा मिळाली) त्याप्रमाणे १९८० साली त्यांनी श्री. पानसे यांच्याकडून श्रींची प्रतिमा (फोटो) हाताने काढून घेतली. त्याची मोठी फ्रेम करून घरात तिची स्थापना केली. सन १९९१-९२ साली ते पी. डब्ल्यू. डी. च्या सेवेतून निवृत्त झाले.

श्रीक्षेत्र गोंदवल्याच्या महिमा वेगळा वर्णन करावा असे नाही. त्यामुळे महाराजांचे अनेक भक्त आणि सेवेकरी गोंदवल्यात येऊन सेवा करू लागले. त्याच सुमारास आबा आणि श्री. रामभाऊ पाठक हे दोघे सेवेत रुजू झाले. सुरवातीला ते भाजी विभागात काम करीत असत. आबांची कामाची तयारी पाहून श्री. रामभाऊ यांनी, श्रीक्षेत्र गोंदवले येथे जे सामान लागते त्याची खरेदी पुण्यातून होत असे, त्याची जबाबदारी आबांच्यावर सोपविली गेली. आबांनी अत्यंत सचोटीने व्यवहार करून अनेक वर्षे ती जबाबदारी सांभाळली.

स्मृती सुमने

**ज्याप्रमाणे एखादा माणूस**
**आपले आयुष्य**
**त्या ध्येयाप्रती वाहून घेतो,**
**त्याप्रमाणे पत्नीला देवाज्ञा झाल्यावर**
**त्यांनी आपले सर्व जीवन महाराजांच्या**
**चरणी वाहिले आणि**
**निरंतर ते सेवेत राहिले.**

१९९४ साली प्रकृती अस्वास्थ्यामुळे आबांची बायपास सर्जरी पुण्यात रुबी हॉल येथे झाली. त्यावेळचा एक प्रसंग - हॉस्पिटलमध्ये त्यांच्या खोलीत मी एकटा असताना रात्री १२.३० च्या सुमारास आबा अचानक उठले आणि मला म्हणाले, 'काही काळजी करू नकोस. महाराजच माझे ऑपरेशन करणार आहेत.' आणि खरंच ३ दिवसांनंतर डॉ. चंद्रशेखर मला म्हणाले, 'यांच्या सारखा विलक्षण माणूस मी पाहिला नाही.' शस्त्रक्रियेनंतर काही दिवसांनी आबा म्हणाले, 'चल डबा आण, मला भूक लागली आहे.' आणि यानंतर आबांची मानसिक अवस्था म्हणजे त्यांनीच म्हटल्याप्रमाणे, 'उर्वरीत जीवन हे आता महाराजांचे आहे.'

संपूर्ण आयुष्यात त्यांना आपल्या धर्मपत्नी सौ. विमल यांची अत्यंत मोलाची साथ लाभली. २००१ साली धर्मपत्नी सौ. विमल माधव देवकुळे यांना देवाज्ञा झाली. त्यानंतर एखादा माणूस ज्याप्रमाणे ध्येयाने वेडा झाल्यावर आपले आयुष्य त्या ध्येयाप्रती उधळून टाकतो, त्याप्रमाणे त्यांनी आपले सर्व जीवन महाराजांच्या चरणी वाहिले आणि अखेरपर्यंत ते सेवेत राहिले.

अनेक वर्षे सेवा केल्यानंतर वयोमानाने प्रकृतीची साथ मिळेनासी झाल्यावर श्री. परांजपेकाका आणि श्री. दामलेकाका यांच्याकडून त्यांनी स्वयंपाक घराची जबाबदारी घेतली. तिथे ही आपल्या शिस्तबद्धतेने काम करून आणि प्रेमळपणे इतर सर्व सेवेकऱ्यांच्या बरोबरीने स्वयंपाक घरातील व्यवस्था यशस्वीपणे सांभाळली. याबाबतीत ही आबांचे वेगळेपणे स्पष्टपणे समोर येते, ते

म्हणजे पौर्णिमेच्या उत्सवाला अनेक भक्तगण येत असत. त्यांच्यासाठी प्रसाद किती करायचा यांचा अचूक अंदाज आबा दर्शन रांग आणि प्रसाद रांग बघून सहजपणे सांगत असत. त्याप्रमाणे किती माणसांसाठी किती सामान लागले आणि किती शिल्लक राहिले आणि त्याप्रमाणे किती सामान मागवायला हवे अश्या प्रकारचे अंदाज जे त्यांनी लिहून ठेवले आहेत. या त्यांच्यातील वेगळेपणामुळे त्यांच्यावर गोंदवल्यातील कोठीचीही जबाबदारी त्यांच्यावर टाकण्यात आली. त्याचा उपयोग आजही श्रीचरणी होत असावा, अशी आशा आहे.

उर्वरित सर्व आयुष्य श्रीचरणी अर्पण केलेल्या आबांना आजवर त्यांनी केलेल्या सत्कर्माचे फळ म्हणून धर्मपत्नी सौ. विमल, मुलं, सुना, जावई, नातवंड आणि पंतवंडांच सुख देखील त्यांनी अनुभवलं. शांत आणि समाधानाने आबांनी आपले आयुष्य व्यतीत केले. अशाप्रकारे संपूर्ण जीवन महाराजांच्याचरणी वाहिलेल्या आबांना रविवार, दिनांक १० सप्टेंबर २०२३ रोजी ब्रह्ममुहूर्तावर एकादशीच्या दिवशी, झोपेतच अतिशय शांतपणे देवाज्ञा झाली.

आजही आम्हाला आमचे आबा आपल्या नाहीत यावर विश्वासच बसत नाही. परवाच आबा माझ्या स्वप्नात आले आणि खोलीत बसले आणि म्हणाले, 'चला, तुम्ही उभयता आणि मी आपण प्रसाद घेण्यास जाऊ या.' माझ्या पत्नीच्याही स्वप्नात आले आणि म्हणाले, 'आम्ही सर्व गोंदवले येथून आलो आहोत. मी थोडे दिवस राहणार आहे आणि परत श्रीक्षेत्र गोंदवले येथे जाणार आहे.' या सर्व गोष्टींच्या आम्ही लावलेला अर्थ हाच की, 'आबा श्रीक्षेत्र गोंदवल्याच्या विश्वात रममाण आहेत आणि श्रींच्या चरणीच वाहिलेले आहेत' यातच आबांच्या आयुष्याची इतिकर्तव्यता!

**प्रल्हाद माधव देवकुळे**

---

काव्य सुमने

## गाडी घुंगराची

मला न्यावयाला आली गाडी घुंगराची
चैतन्य ब्रह्माची गाडी आली घुंगराची

गाडीमध्ये बैसुनी मी गोंदवले गेले
चैतन्य स्वामींच्या चरणी भावे मी बैसले
अवचित लागे मला गोडी ही नामाची ॥१॥

जयाचा हो जन्म नामार्थ झाला
जयाने सदा वास नामात केला.
तयाने लावली गोडी अमृताची ॥२॥

धन्य कीर्ती झाली कित्येक मंदिरे स्थापियली
जयाने मनास शांती किती ही दिधली
समाधी पाहिली मी हो सद्गुरू कृपेची ॥३॥

चैतन्य ब्रह्माचे रूप मी वर्णिले
ब्रह्मचैतन्याचे रूप मी पाहिले
राम नाम घेता तृप्ती झाली हो मनाची ॥४॥

गाडी घुंगराची हो आली गाडी घुंगराची...

**श्री बाळकृष्ण दंडगावकर**

स्मृती सुमने

## `गोड सदा बोलावे नम्रपणे सर्व लोक प्रिय व्हावे`
## हा श्रींचा निरोप कसोशीने पाळणारे

# श्री विनायक गोविंद नातू

**पहारा सेवा.**

त्यांची व माझी भेट २००८ साली झाली. ते त्या वेळी नुकतेच पहारा सेवा बघू लागले होते. त्यांच्या नम्र व गोड बोलण्या मुळे ते लगेचच लोकप्रिय झाले. माणसाला ते एका भेटीतच ओळखायचे.



**पहारा सेवेमधील एक जेष्ठ साधक श्री श्रीराम तांबाळकर त्याच्या बद्दल लिहितात–**

आदरणीय नातू यांचा जो थोडा सहवास झाला त्यातून मला दिसून आलेले ठळक गुण म्हणजे सोपवलेली कामगिरी अतिशय प्रामाणिकपणे पार पाडणे. दुसरा भावलेला गुण, लहान मोठ्यांशी विनयशीलपणे मोठेपणा देवून वागत. दुसऱ्यांना आनंद देण्यात त्यांना आनंद वाटे. त्यांच्या वयाचा विचार करता ते ज्या आत्मीयतेने सोपवलेलले कार्य करीत ते बघून त्यांच्याबद्धलचा आदर द्विगुणित होतो. माझी त्यांना ही आदरांजली.

**त्यांना एक मुलगा व दोन मुली. त्याची मधली मुलगी सौ वीणा ताई वझे, बेळगावी (उज्वला) ही फार लाडकी होती. ती आपल्या वडीलांच्या बद्दल लिहिते–**

तीर्थरूप बाबा साधारण १९८५ साली सज्जनगड येथे गेले होते. तेव्हा त्यांना प. पू. बाबा बेलसरे यांच्याकडे जाण्याचे संकेत मिळाले. आमचे बाबा दत्त उपासक होते, पण त्यांचे मन शांत होत नव्हते. नंतर ते मालाडला जाऊन पू. बेलसरे बाबांना भेटले. त्यांनी, ‘तुमची गेल्या जन्मीची राम उपासना असून तुम्ही गोंदवले येथे जाऊन अनुग्रह घ्यावा.’ असे सांगितले. त्याप्रमाणे बाबा त्यावेळी गोंदवल्यास गेले खरे पण त्यांनी अनुग्रह घेतला नाही. काही काळानंतर एकदा गोंदवल्यात येथे पुनः त्यांची बाबा बेलसरेंशी भेट झाली, बघताक्षणी पू. बाबा बेलसरे माझ्या बाबांना म्हणाले, ‘काय हो अजून काठावरच काय?’ तेव्हा पासून बाबा महाराजांचे निस्सीम भक्त झाले.

माझी आई २००५ मध्ये ब्रेन ट्युमर मुळे आजारी होती. तिची अवस्था बिकट होती व बाबांना ते पाहवत नव्हते. त्यानी महाराजाना विनंती केली, नंतर म्हणाले, ‘गणपती होऊ दे रविवार पर्यंत वाट पहा शांतपणे सर्व होईल.’ श्रींचीच प्रेरणा! आणि आश्चर्य गणपती विसर्जन झाल्यावर रविवारी अष्टमीला गौरी जेवणाच्या दिवशीच बोलत बोलत गेली.

दत्त महाराजांचे खूप अनुभव त्यांना होते. शेवटी शेवटी फेब्रुवारी २०१९ मध्ये दादाने बाबांना बेळगांवला आणून पोचवले तेव्हा तसे ते थकलेच होते. फारसे जेवण जात नव्हते. फळांचा रस, चहा, अर्धी गरम पोळी एवढ्याच आहारावर होते. झोपून झोपून अंगही दुखायचे, चेपून दिले तर फार तर दोन पाच मिनिटे बरे वाटायचे नंतर पुन्हा सुरु. एके रात्री असेच अंग दुखते अशी तक्रार

करतच झोपले. छोटीशी पेन किलर चालूच होती फारसा उपयोग होत नव्हता. मी त्यांच्या खोलीत खाली गादी घालून झोपायची. एकदा रात्री दोन अडीच वाजता त्यांनी मला हाक मारली, म्हणाले, 'महाराज आले होते, पाल्याचे औषध देवून गेले. आत्ता अंग दुखत नाही. उरलेला पाला समाधी मंदिरात मागे ठेवला आहे जावून घेवून ये.' खूप आनंदात व प्रसन्न होते. मी त्यांची काहीतरी समजूत घातली व झोपवले. पण सकाळी उठल्यावर देवापुढे दिवा लावायला गेले तर ताजी तुळशीची डिक्षी दिसली. मलाही आश्चर्य वाटले मी तीचाच रस काढून दिला. त्यानंतर कधीही त्यांनी अंगदुखीची तक्रार केली नाही. सर्वच अतर्क्य. महाराजांची कृपा दुसरे काय?

थोड्याच दिवसात बाबा म्हणजे गोंदवल्याच्या पहारा ग्रुप चे नातू आजोबा १३ जुलै २०१९ रोजी श्री महाराजांच्या चरणी विलीन झाले. गोंदवले ग्रामस्थ अजूनही त्यांची आठवण काढतात.

**संकलन – श्री श्रीपाद देव**

काव्य सुमने



**परमपूज्य ब्रह्मानंद महाराजांचे श्रीसद्गुरु स्तुति कवन आणि त्यांच्या वचनांवर आधारित प्राकृत श्रीगुरुस्तवन.**

## ॥श्री सद्गुरु स्तवन॥

असे नाम दुर्लभ जे इंद्र ब्रह्मा।
दिले भक्तवृंदास त्या रामनामा॥
जये अर्पिल्या चित्त वृत्ती श्रीरामा।
नमस्कार त्या नित्य चैतन्य ब्रह्मा ॥१॥

त्यजी वस्त्र आदि असे शुद्ध शांत।
दिसे रूप ते देखणे कौपिनात॥
नसे शत्रु मित्रातहि भेद ज्यांना।
नमस्कार त्या नित्य चैतन्य ब्रह्मा॥२॥

न स्पर्शे जसे पंक, पाणी नभाला।
न स्पर्शे तसे गूण माया जयाला॥
अशा सच्चिदानंद शांति स्वरूपा।
नमस्कार त्या ब्रह्मचैतन्य रूपा ॥३॥

न मी तापसी ना असे राज योगी।
न मी सिद्ध कोणी म्हणे *नाम* जोगी॥
नसे गर्व ज्यांना परी सर्व ज्ञाता।
नमस्कार त्या ब्रह्मचैतन्यनाथा ॥४॥

हनूमान अवतार सद्गुरु राव।
नसो मानसी संशया काही वाव॥
जयांच्या कृपे लोपती सर्व भ्रांती।
नमस्कार त्या ब्रह्मचैतन्य मूर्ती ॥५॥

असे 'श्री' च भगवंत राम स्वरूपी।
भले पाही लोकांस श्रीराम रुपी॥
असे जे परी सर्व सृष्टी नियंता।
नमस्कार त्या ब्रह्मचैतन्यनाथा ॥६॥

असे विश्वव्यापी महा शक्तिमान।
अणुच्या परे ते अतीसूक्ष्म सान॥
असे जे परब्रह्म ॐकार रूपा।
नमस्कार त्या ब्रह्मचैतन्यरुपा ॥७॥

म्हणे नाम अवतार श्री भक्त ज्याला।
करी शांत जे नीर भवानलाला॥
कृपा दृष्टीने पाही जे रामनामीं।
नमस्कार त्या ब्रह्मचैतन्य स्वामी ॥८॥

जये दृष्टी पाते जळे सर्व पाप।
नुरे *श्री* कृपेने भवाचेहि ताप॥
जनां बोधुनी सांगती नाम-गाथा।
नमस्कार त्या ब्रह्मचैतन्यनाथा ॥९॥

जिवा पाहती आत्मदृष्टी धरोनी।
कृपे जाय ते जन्म मृत्यू सरोनी॥
सदा नाम घ्या सांगती तळमळोनी।
नमस्कार त्या ब्रह्मचैतन्य स्वामी ॥१०॥

**श्री. दामोदर मुळे**



# इंदोर येथील श्री ब्रह्मचैतन्य महाराज उपासना केंद्र




श्रीमहाराजांची उपासना श्रीचैतन्य राममंदिर जुनी इंदोर, मध्य प्रदेश येथे प.पू.श्री दत्ता भय्या कुलकर्णी (डी.पी.कुलकर्णी) यांच्या प्रेरणेने व उपस्थितीत दि. १९ जानेवारी १९८२ ला सुरू झाली. त्या वेळी ही उपासना, ९ बक्षिबाग येथील त्यांच्या निवासस्थानी काही वर्ष झाली. त्या नंतर नियमितपणे मंदिरात अनवरत सुरू आहे. श्रींना आवडणारे राम नामस्मरण हा मुख्य उद्देश आणि त्या अनुषंगाने सोबत अन्नदान हा हेतू समोर ठेवून प्रत्येक रविवारी ही उपासना सकाळी बरोबर ९ वाजता सुरू होऊन १०.३० पर्यंत असते.

या उपासनेत सुरुवातीला सकाळी ९ ते ९.३० सामूहिक मौन नामजप नंतर ९.३० ते ९.५० वीस मिनिटे पूज्य श्री के. वि. बेलसरे लिखित श्रींच्या चरित्राचे वाचन होते. ९.५० ते १० पूज्य श्री गो. सी. गोखले संकलित दोन मराठी प्रवचने, म्हणजे त्या दिवशीच्या व दुसऱ्या दिवशीच्या प्रवचनाचे वाचन होते. त्यानंतर ५ मिनिटे नाम संकीर्तन "रघुपती राघव राजाराम पतीत पावन सीताराम" होते व नंतर १०.२० पर्यंत आरती, श्लोक व नामाचा समास हा कार्यक्रम होतो. त्यानंतर "बोलो सीताराम" च्या गजरात दर्शन घेऊन ब्रह्मानंद हॉल मध्ये प्रसाद घेऊन मंडळी आनंदाने आपापल्या घरी जातात.





श्रींची उपासना केंद्रे

महिन्यातील एका रविवारी श्री विष्णू सहस्त्रनाम व भजन झाल्यावर ११.३० वाजता महाआरती होऊन महाप्रसादाचे आयोजन केले जाते.या शिवाय दर महिन्याच्या शु. एकादशीला फिरता जप सकाळी ६ ते सायं ६ करण्यात येतो. त्याच दिवशी ४.३० ते ५ श्री विष्णु सहस्त्रनाम, श्रीराम हृदय, नामाचा समास यांचे सामूहिक पठण होऊन सायं ६ ते ७.३० श्रीराम रक्षा, मारुती स्तोत्र, भजन व आरती होऊन कार्यक्रम संपन्न होतो.या शिवाय पूर्ण कार्तिक महिन्यात काकडा आरतीचा कार्यक्रम होतो.



तसेच विशेष करून खालील उत्सव साजरे केले जातात –
श्रीराम नवमी ९ दिवस, गुरुपौर्णिमा ३ दिवस, पुण्यतिथी श्री क्षेत्र गोंदवले येथील पद्धतीने १० दिवस.पुण्यतिथी उत्सवात कीर्तन, प्रवचन, पहारा, व इतर उपासना यथासांग होते. उत्सवात रोज अन्नदानही असते.

शिवाय वेळोवेळी धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. जसे यावेळी अधिक म्हणजे पुरुषोत्तम मासात जालना येथील वे.शा.स. श्री रामदास आचार्य यांची श्रीराम कथा आयोजित करण्यात आली होती. श्री गोंदवले संस्थान यांच्या सहयोगाने निर्मित श्री आनंद सागर हॉल मध्ये याचे आयोजन करण्यात आले. वर २ खोल्या व २ प्रत्येकी प्रसाधन गृह निर्माण झाल्याने प्रवासी भक्तांना, भाविकांना निवासाची सोय झाली आहे.
श्री प्रकाश जोशी उत्तम रित्या मंदिराची पुजा आणि आवश्यक सेवा उत्तम रीतीने पार पाडतात. विश्वस्त म्हणून श्रीमहाराज आहेतच पण सोबत सर्वश्री, अविनाश सरवटे, ललित नम्र, दीपक कोठारी, हरीश खरगोणकर, शरद सरवटे, सागर शेंडे ही मंडळी व्यवस्था बघतात.

श्रीराम

---

काव्य सुमने

## *गोंदवल्याचा राम*



गोंदवल्याचा राम गोंदवल्याचे वैभव।
मूर्ती पहाता मिळतो आनंद अनुभव ॥धृ॥

रामा पुढे उभे राहता अवगुणांची होई जाण
त्याच्या दर्शने होते सद् परिवर्तन
शरणांगतासी करील कृपा तोच एक राव ॥१॥

सूर्यप्रकाशा सारिखा सत्तारूपी राहतो
त्याच्या सहवासाचा अनुभव येतो
पाषाणाची मूर्ती देखील दर्शविते भाव ॥२॥

महाराजांनी कपिची मूर्ती कोरली स्वहस्ते
स्थापिली श्रीरामा पुढे रामासह विराजते
मंदिरात जप करता येई प्रेमभाव ॥३॥

महाराजांचा हर एक राम आहे बोलका
पुन्हा पुन्हा पाहता आनंदा ये भरता
नि:संशय प्रेमाचा करील तो वर्षाव ॥४॥

**श्री अरुण गांगल, कर्जत**

### स्वानुभव सुमने

परमार्थ प्रधानतः अनुभवाचे शास्त्र आहे. परमार्थाच्या दृष्टीने साधकाची साधनेमध्ये जशीजशी प्रगती होत जाईल तशी तशी त्याच्या ठिकाणी भगवंताबद्दल स्वाभाविक आवड निर्माण होणे तसेच या जगातील मान, लौकिक, पैसा घरदार नातेवाईक इत्यादी गोष्टीबद्दल आवड अगदी आतून कमी होत जाणे हा खरा अनुभव आहे. तरीसुद्धा सामान्य प्रापंचिकाला सुरवातीला भगवंताच्या अस्तित्वाची जाणीव व्हावी किंवा या मार्गात पाऊल पडावे अशा दृष्टीने प्रपंचात मदत होणाऱ्या अनुभवांना या मार्गात महत्व आहेच. अशा अनुभवांनीही परमार्थ मार्गात सामान्य माणूस वाटचाल करू लागतो व भगवंत अथवा सद्गुरू यांच्या अस्तित्व भावनेने त्याच्या काळजीचे प्रमाण काही प्रमाणात तरी कमी होतेच. अशा अनुभवांपैकी काही अनुभवांचे उल्लेख येथे केले आहेत तरी खरा अनुभव साधनेत प्रगती होणे हा आहे, हे आपण लक्षात ठेवावयास हवे.

# ‘अहेतुक कृपासिंधु’ श्री गोंदवलेकर महाराज

सद्गुरूंचा लाभ पूर्वपुण्याईमुळे होतो असे जाणकारांचे मत आहे. परंतु लाभ झाल्यावरही बऱ्याच वेळा, त्याचे खरे मूल्य कळायला वेळ लागतो. विविध मार्ग जरी दिसत असले तरी, सारे एकाच ठिकाणी पोचतात. याची उकल लवकर होत नाही. परंतु प्रचीती आणि अनुभव मिळाल्यावर मात्र, साऱ्या गोष्टी मान्य कराव्या लागतात. या उतार वयात गोंदवलेकर महाराजांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी ही संधी आहे, म्हणून हा लेख लिहिला आहे. त्यांनी वेळोवेळी उदार अंत:करणाने केलेली कृपा मी कधीच विसरू शकत नाही. विशेष म्हणजे ज्या काळात ह्या गोष्टी घडल्या, त्यावेळी मला त्यांच्याविषयी फार माहितीही नव्हती. आणि तरीही त्यांनी मला जवळ केले, याचे खरेच आश्चर्य वाटते. म्हणूनच शीर्षकात ‘अहेतुक कृपासिंधु’ असे त्यांचे यथार्थ वर्णन केले आहे. आपणहून त्यांनी माझे बोट धरून, परमार्थ मार्गात चालायला शिकविले. मनात असलेली पूर्वग्रहदुषित व चुकीची तर्क प्रणाली, प्रत्यक्ष अनुभव देवून त्यांनी घालविली. त्यांचे अखंड उपकार आहेत. त्यांच्या कायम ऋणात रहाणेच योग्य ठरेल. मला जर त्यांच्याविषयी एवढया तीव्र भावना आहेत. तर त्यांची आयुष्यभर भक्ती करणारे शिष्य व भक्त यांना किती प्रेम उचंबळून येत असणार, याची कल्पनाच केलेली बरी विशेषतः ब्रह्मानंद महाराजांसारखे पट्टशिष्य ज्या आदरयुक्त पद्धतीने वागत होते हे पाहिल्यावर गोंदवलेकर महाराजांच्या दिव्य ईश्वरी शक्तीविषयी काही शंकाच रहात नाही. लोककल्याणासाठीच त्यांनी जन्म घेतला हे सिद्ध होते.

माझे बालपण सुदैवाने चांगल्या कुटुंबात गेले. त्यामुळे संस्कारही चांगले होते. तरीही अनेक कारणामुळे सद्गुरू प्राप्तीसाठी विलंब झाला म्हणजे वयाचे ३३ वर्ष उजडावे लागले. सुरवातीला ध्यानमार्गामुळे ध्येयप्राप्ती लवकर होऊ शकते अशी माझी धारणा होती. आणि त्या दृष्टीने गणेशपुरीच्या स्वामी मुक्तानंदांकडे मी दोन वर्ष सातत्याने जात होतो. परंतु माझे गुरुदेव प. पू. गुळवणी महाराज होते. हे अगोदर कळले नाही. एका दृष्टांतामुळे व महाराजांचे जवळचे शिष्य पितृतुल्य श्री नारायणराव मोघे यांच्या मार्गदर्शनामुळे अनुग्रहाचा लाभ झाला. पुढील माझ्या आत्तापर्यंतच्या आयुष्यात अनेक संप्रदाय, अनेक सत्पुरुष, अनेक संत यांच्याबरोबर योगायोगाने म्हणा. पूर्व सुकृतामुळे म्हणा, जवळचे संबंध आले, सहवास लाभला. खूप शिकायला मिळाले. आणि सर्वांमधे सद्गुरू तत्त्व एकच असते अशी दृढ भावना झाली. कारण तसे अनुभवच आले. नामसंप्रदाय, जप व अनुसंधान यांच्या मागे शतकानुशतके तपश्चर्या केलेल्या ऋषी, मुनी (नारद) सद्गुरू, साधू–संत, सत्पुरुष यांच्या अनुभवाचे बळ आहे. ‘नामाचे’ निश्चित तत्वज्ञान आहे. गोंदवलेकर महाराजांनी वेळोवेळी दिलेल्या प्रवचनांचा संग्रह, ३६५ प्रवचनांच्या रूपाने गो. सी.

स्वानुभव सुमने

## ‘अहेतुक कृपासिंधु’ श्री गोंदवलेकर महाराज

गोखलेंनी प्रसिद्ध केला. त्यांचे सारं तत्वज्ञान व विचारसरणी त्या ग्रंथात ओतप्रोत भरलेली आहेत. शिवाय पू. बाबा बेलसऱ्यांनी लिहिलेल्या चरित्रग्रंथात हे सारे ज्ञान प्रतिबिंबित आहे. महाराज ‘पेटीवर’ आल्यावर, त्यावेळीही त्यांनी केलेले मार्गदर्शन उपलब्ध आहे. वर्षानुवर्षे साधन करून बोध, विश्वास व निष्ठा ज्या प्राप्त होतात ते सारे एखाद्या जबरदस्त अनुभवानेही प्राप्त होते. आणि त्या अनुभवामुळे नास्तिक असलेला आस्तिक होऊ शकतो, इतके ते प्रभावी असतात, यात शंका नाही.

मी मुंबईमध्ये भाभा अणुशक्ती केंद्रात २५ वर्षे विविध पदावर नोकरी करत होतो. पुढे Deputation वर पुण्याला येऊन उरलेली १२-१३ वर्षे सर्विस झाली. परदेश दौरे झाले व त्यावेळेही अनेक आश्चर्यकारक अनुभव मिळाले. माझे वास्तव्य २२-२३ वर्षे ठाणे येथे होते. तिथे एका ख्यातनाम सत्संग मंडळाचा मी सभासद होतो. तिथे दिग्गज मंडळींचा वावर होता. ६०-७० च्या दशकातली ही गोष्ट आहे. या व्यतिरिक्त अनेक संप्रदायांचे शिष्य, प्रवचनकार, कीर्तनकार, भजन करणारे या साऱ्यांनी तिथे हजेरी लावलेली आहे. न्यूज पेपर एजन्सी चे केशवराव आपटेही येत असत. ते ठिकठिकाणी १२-१२ तासांचे त्रयोदशाक्षरी रामनामांचे कार्यक्रम ते स्वतः घडवून आणत असत. त्यांनी एकदा आमचा १०-१२ जणांचा ग्रुप घेऊन पेण व रसायनी जवळच्या मोपाडा या गावी ‘रामनवमी’ निमित्त नेला होता. इथले राममंदिर गोंदवलेकर महाराजांच्या प्रेरणेने, ते हयात असतानाच स्थापित झालेले आहे. महाराजांनी मला पहिला अनुभव या ठिकाणी दिला.

मोपाडयाला पोचल्यावर मंदिराच्या विश्वस्तांनी आम्हा सर्वांचे उत्तम स्वागत केले व छान व्यवस्था ठेवली होती. रामनवमी निमित्त येथे २४ तासांचे नामस्मरण होते. म्हणजे आदले दिवशी दुपारी १२ ला सुरु करून, दुसरे दिवशी १२ ला, रामजन्माच्या वेळी कीर्तनकारांसमवेत संपवायचे. नामस्मरण बसून करायचे नव्हते, तर झांजा, चिपळ्या घेऊन मंदिराभोवती ‘श्रीराम, जयराम जयजयराम’ हा मंत्र नाचत नाचत एका लयीत करायचा होता. पहारा करतात त्याप्रमाणे दिवसा आणि रात्री १२ पर्यंत भाग घेण्यासाठी खूप नावे आली. आपटेनी अगोदरच सांगितल्याप्रमाणे रात्री व पहाटेसाठी नाव दिलं कारण त्यावेळी भाग घेणारे कमी असतात. त्याप्रमाणे माझ्या टीममधील इतर दोघांबरोबर माझी फेर धरण्याची वेळ पहाटे ४ ते ७ या वेळेत होती. माझी नामस्मरणाची आवड बेताचीच होती, हे सर्वांना माहित होते. आम्ही तिघांनी झांजा, चिपळ्या वाजवत एका लयीत नामस्मरण करीत फेर धरायला सुरुवात केली. पहिल्यांदा संथ सुरवात झाली. नंतर मात्र सर्वांचा वेग वाढला व मला काहीतरी आतून बदल झालेला जाणवू लागला. आपण काहीच करत नाहीय. सर्व क्रिया आपोआपच होत आहेत असे वाटू लागले. त्या दोन/अडीच तासात माझे भान हरपले होते व तो अनुभव अविस्मरणीय होता. रामनवमीच्या दिवशी महाराजांनी मला चकित केले होते. अशा जणू आपोआप तरंगत झाल्याप्रमाणे फेऱ्या झाल्यामुळे अजिबात श्रम झालेले नव्हते. आजही त्या गोष्टीचे अप्रूप व आश्चर्य वाटते.

पुढील अनुभव एका भजनासंबंधी आहे. रामकृष्ण परमहंस व विवेकानंद यांच्या साहित्याची मला भरपूर आवड आहे. त्यांच्या चरित्रात एके ठिकाणी रामकृष्ण म्हणाले की, देवाबद्दल निर्व्याज प्रेम निर्माण होण्यासाठी भजनासारखा अन्य उपाय नाही. त्यासाठी सूर, ताल, व आवाज चांगला असायलाच पाहिजे असे काही बंधन नाही. पूर्ण भावाने म्हटले की, ते देवापर्यंत पोचते. त्यांच्या या सांगण्यातून स्फूर्ति घेवून मी सुरवात केली. रोज रात्री झोपण्यापूर्वी `रामरक्षा` म्हणण्याची मला सवय होतीच. त्यालाच जोडून मी एक भजन म्हणू लागलो. त्याकाळी आर. एन. पराडकर हे गायक मुंबई-पुणे आकाशवाणीवर चांगली भजने सादर करीत होते. त्यातले एकनाथ महाराजांचे, ‘आवडीने

स्वानुभव सुमने

## 'अहेतुक कृपासिंधु' श्री गोंदवलेकर महाराज

भावे हरिनाम घेसी, तुझी चिंता त्यासी सर्व आहे.' असे ५ ओळी पद असलेले मला फार आवडायचे. त्यातली शेवटची ओळ म्हणजे 'एका जनार्दनी भोग प्रारब्धाचा हरिकृपे त्याचा नाश आहे.' ही जास्तच आवडायची. कर्मसिद्धांता प्रमाणे आपण केलेल्या कर्माचे फळ भोगावेच लागणार! मग आपली सुटका होणार तरी कशी? पण ती शेवटची ओळ, 'बुडत्याला काठीचा आधार' म्हणताना तशी होती. मी अगदी मन लावून त्या दिवसापासून भजन म्हणू लागलो. नित्यजीवनातला हा एक अविभाज्य भाग बनून गेला. पण एक वर्षानंतर चमत्कार घडला. पहाटेच्या वेळी गोंदवलेकर महाराज स्वप्नात आले व म्हणाले, 'तुझे ते कोणते आवडते भजन आहे ते म्हण पाहू!' मला खूप आश्चर्य वाटले. लाल काठाचे धोतर नेसून, दोन गुढग्यावर हात ठेवून ते समाधीसमोर सिंहासनावर बसले होते. समोर दाटीदाटीने भक्त मंडळी बसली होती. स्वप्नातच संगीताच्या बाबत 'ओ का ठो' माहित नसलेला मी, कसलेल्या गवय्यासारखा गाऊ लागलो. अतीव आनंदात होतो. शेवटी भजन संपले. महाराज लगेचच म्हणाले, 'वाह, छान झाले की भजन!' माझ्या अंगावर मुठभर मास चढले आणि मला जाग आली. पुढे त्याच आनंदात झोपही लागली नाही. वर्षभर भजन म्हटल्याची महाराजांकडून पावती मिळाली, असे मात्र जरूर वाटले. पण खरी गंमत पुढेच आहे, महिन्याभरातच मला गोंदवल्याला जाण्याची संधी मिळाली. त्यावेळी समाधी मंदिराच्या बाहेर, हेच भजन सर्वांना दिसेल असे आकर्षक पद्धतीने फलकावर लिहिलेले होते. तेव्हा माझी खात्री झाली की, ते भजन गोंदवलेकर महाराजांनाही मनापासून आवडत असणार.

१९८० पासून पुण्याला आल्यावर सहजच गोंदवलेकर महाराजांच्या बऱ्याच शिष्यांच्या ओळखी झाल्या व मैत्रीही झाली. अप्पासाहेब चिवटे, गो. सी. गोखले, मराठे बंधू, मनोहर बंधू, अत्रे सर, व. दि. कुलकर्णी ही सर्व मंडळी गोंदवल्याच्या शिबिराला जात असत व अप्पासाहेबांबरोबर मीही जात असल्यामुळे परिचय वाढला. वर्षातून पू. बाबा बेलसरे ५ दिवसांचे शिबिर घेत असत व त्यांना खूप चांगला प्रतिसाद मिळत असे. दिवाळीतल्या एका शिबिराची अजून आठवण ताजी आहे. त्याचे कारण असे होते की, तेल लावून अभ्यंगस्नान वगैरे होऊन फराळाची पंगत होती. माहेरी सुद्धा होणार नाही एवढे कौतुक गोंदवल्याला झालेले आहे.

माझा यापुढचा अनुभव माझ्या सौ. नी आमच्या घरी ठरविलेल्या २५ तासाच्या जपामुळे आला. सौ. अंजलीचे माहेर हे कर्नाटकातील शिरहट्टी या गावाचे. हे गाव पूर्वी सांगलीकर संस्थानाच्या अधिपत्याखाली होते. म्हणून, खूप मराठी कुटुंबे तिथे स्थायिक झालेली आहेत. शिरहट्टी जवळ ब्रह्मानंद महाराजांचे वेंकटापूर व बेलधडीचे राममंदिर असल्यामुळे सौ. अंजलीला लहानपणापासून तेथील उत्सवानिमित्त जाण्याची सवय होती. भोजनप्रसादही मिळत असे. या सर्व कारणामुळे तिला सहजच रामनामाची जात्याच आवड होती. आम्ही पुण्याला स्थायिक झाल्यावर ती नियमाने आमच्या भागातील महाराजांच्या केंद्रावर उपासनेसाठी जाऊ लागली. तिथे अश्विनी देऊसकर यांच्या ओळखीमुळे आमच्या घरीही २५ तासांचा जप करण्याची योजना तयार झाली. जून महिन्याची ७ तारीख आम्हाला मिळाली. हे सारे ठरल्यावर मी सौ. अंजलीला म्हणालो, 'आपण इतक्या साऱ्या गोष्टी करीत आहोत, त्यात आणखी भर घालायची का, विचार कर.' विशेषतः रात्रीच्या वेळी जपाला लोक नसतात. जपाची वेळ आदले दिवशी सकाळी ६ पासून दुसरे दिवशी ७ पर्यंत होती. पण तिने निर्धारच केल्यामुळे, ती एवढंच म्हणाली. 'सारे काही ठीक होईल तुम्ही काळजी करू नका!' आणि विषय संपला.

असे जरे असली तरी जपाच्या आदले दिवशी, सर्व तयारीत. मीही भाग घेतला. टीपॉयवर

## 'अहेतुक कृपासिंधु' श्री गोंदवलेकर महाराज

महाराजांचा फोटो मांडून सुंदर आरास करण्यात आली. ६ वाजता जप सुरु झाला व जपकार मंडळी त्यांच्या सवडीप्रमाणे तसा दोन तास जप करून, लाडू व दुधाचा प्रसाद घेवून परतत होती. मी दुपारच्या वेळी, हॉलमध्ये पेपर वाचत बसलो होतो. तेवढ्यात एक वयस्कर बाई आल्या व 'केळकर इथेच राहतात का?' असे त्यांनी विचारले मी 'हो' म्हणालो, व जपासाठी आल्या असतील म्हणून, देवघरात उपासना चालू आहे, असे सांगितले. पण त्या म्हणाल्या, 'अगोदर तुम्हाला भेटायचे आहे.' मग जे काही त्यांनी सांगितले, ते ऐकून मी चक्रावूनच गेलो. 'मला आपले घर कर्वेनगरमध्ये नक्की कुठे आहे, हे माहित नव्हते. पण प्रत्येक चौकात अशी माणसं भेटली की जणू गोंदवलेकर महाराज मला मार्गदर्शन करीत होते, म्हणून चालत तुमच्या घरी बरोबर पोचले आहे. तुमच्यासाठी महाराजांचा निरोप आहे तो सांगायचा आहे. त्या पुढे म्हणाल्या, 'तुमचे ध्यानाचे साधन चालू दे! पण त्याबरोबर जपही करा. अहो, महाराजांचे प्रेम आहे, तुमच्यावर! जपाला काही मोज माप आहे का? केव्हाही करा. ते एकदा अंगात भिनले की श्वासोच्छवासाप्रमाणे आपोआप होत राहील.' माझ्याशी त्या खूप वेळ बोलत होत्या. त्या अनपेक्षित भेटीमुळे व त्यांच्या मनापासूनच्या सांगण्यामुळे माझ्यामध्ये सकारात्मक बदल झाला. व त्या रात्री आणि पहाटे मी बराच वेळ जपाला बसलो होतो. सकाळी ७ वाजता जपाची सांगता झाली. महाराजांची आरती आणि मंत्रपुष्पांजली सारे झाले. आणि पुढे भजन सेवेला सुरवात झाली. आणि इथेच महाराजांनी आपल्या अद्भुत कृपेची चुणूक दाखविली. जमलेल्यामध्ये एकएक जण भजन म्हणत होते व मीही माझ्या आवडीचे भजन म्हणू लागलो. उत्साहात, 'आवडीने भावे' हे भजन सुरु केले, पण एकदम काय झाले हे कळायच्या आत, तीच तीच ओळ भावावस्थेत पु:न पु:न म्हणू लागलो. मी कुठे आहे, हेही नीट कळेना! जमलेले इतर म्हणू लागले, 'काकांना बी पी वगैरे आहे का?' त्यांना चक्कर आली आहे? असे वेगळेच प्रश्न निर्माण झाले. त्याही अवस्थेत मला हे सारे ऐकू येत होते व Register होत होते. 'तसे काही नाहीये!' असे मी म्हणालो. आणि एकदम शेवटची ओळ म्हणून मी भजन संपविले. नंतर त्या अवस्थेत माझा हात धरून मला दुसऱ्या खोलीत बेडवर झोपविण्यात आले. मी शांतपणे, आनंदात पडून होतो. जागा होतो. मध्ये मध्ये नामस्मरण कुठे चालू आहे? असे विचारत होतो. त्या सुखद अवस्थेत काही तास पडून होतो. साडेबारा/एकच्या सुमारास कुणीतरी घरात बोलत होते. 'दादांची, आज ग्राहक मंचाच्या केसची तारीख आहे.' हे कसे ऐकू आले माहित नाही, पण ही प्रपंचातली गोष्ट ऐकल्याबरोबर मी खाडकन भानावर आलो. पण ही सुंदर अनुभवाची अवस्था एकदम नाहीशी झाली, याचे वाईट वाटले. पुढे त्या केसशी माझा प्रत्यक्ष संबंध जरी असला तरी मी हजर राहिलो नाही. तसे कळवून टाकले. पण त्यादिवशीचा तो आनंदाचा तो प्रवास आजही लक्षात आहे.

श्रीगोंदवलेकर महाराजांनी एके ठिकाणी म्हटले आहे की 'योगमार्गातील ध्यानासंबंधीचे अनुभव नामस्मरण करणाऱ्या साधकांनाही येतात' हे मी आता खात्रीने सांगतो. अशा प्रकारे माझ्या सारख्या सामान्य साधकाला त्यांनी अपूर्व कृपा करून, तो दिव्य अनुभव जो दिला, तो आजही माझ्या स्मरणात नित्य आहे. त्यामुळे निरंतर नामस्मरण आणि अनुसंधानात असणारे त्यांचे भक्त खूप भाग्यवान आहेत. त्या कृपासिंधु दयासागर महाराजांनी दिलेल्या काही अनुभवाविषयी मला सांगता आले, हे माझे परम भाग्य समजतो.

**ग. ना. केळकर, पुणे**

श्रीमहाराज उपदेशामृत

## मन स्वाधिन ठेवण्याचा उत्तम उपाय

श्रीरामरामायनमः ॥ जसा एक सुटला तुफान वारा । तेणें मृत्यु लोक बुडविला सारा । सुख दुःखाचें अधिष्ठान । त्याचे नांव मुख्य मन ॥ तृष्णा वासना अहंकार ॥ हा मनाचा विकार ॥ काम विषय गोडी ही मनाची आवडी ॥ लोभ ममता ही मनाची अहंता ॥ आधि व्याधि ही मनाची मानीव बुद्धि ॥ मनामाजी पंचविषय । रजतम सात घेऊन ॥ मन करी जन्म– जन्माचा घात ॥ जैसे शरीराचे दोन हात ॥ तैसें मन दो–प्रकारें रहात ॥ मन म्हणजे प्रकृति आधिन ॥ सत्याचें करी विसर्जन ॥ हा एक प्रकार ॥ दुसरी एक सांगतो खूण ॥ प्रथम सूक्ष्म आणि सत्य ॥ निजमना ते न मानी अल्प अज्ञान ॥ म्हणूनी वासनात्मक बंधन । सत्य सत्य माझें वचन । आतां आवरी चंचल मन ॥ तेंच सांगतो तुज खूण ॥ सहज होय समाधान ॥ तुटे भव बंधन । मन घेई सुख सात ॥ निजमन त्याचा करी घात ॥ मनामाजी आधि व्याधि भारी ॥ निजमन त्याचा वध करी ॥ ममता अहंता लोभ ॥ हा मनाचा स्वभाव ॥ श्रीराम श्रीराम श्रीराम ॥ तेथें जाऊनि निजमन ॥ तत्काळ करी शिरच्छेदन ॥ मनापाशीं सर्व वासना लोलंगत ॥ निजमन करी त्याचा घात ॥ मन मानी विषयभोग ॥ निजमन त्याचा करी घात ॥ मन मानी भवरोग ॥ भोगाची बळ सत्ता ॥ निजमन त्यासी मारी लाथा ॥ ऐशी मनाची गती । तत्काळ परमार्थ प्रचिती । निजमन करी स्थिर ॥ राम नाम जपे निरंतर ॥ कदापि

श्रीमहाराज
# उपदेशामृत

**मन स्वाधिन ठेवण्याचा उत्तम उपाय...**

न पडावा अंतर ॥ हें ब्रह्मज्ञान द्वादश वाक्याचा सार ॥ वेदांत मथित गर्भार्थ ॥ वाचा तींत निज आस ॥ ऐसे कोणी चतुर जाणती संत । येरव्ही परमार्थी दरिद्री किंकर ॥ ते काय नाम जाणती सार ॥ जे अभिमानी नर ॥ अहो तया खळासी नाम दुर्लभ ॥ आदिशक्तीची मूळ माया ॥ जनक जननी ॥ तिशीं होती नामा विषयीं भ्रांती ॥ तेथे अल्पज्ञ काय कलीमाजीं इतर साधनें पहाती ॥ मुख्य या युगीं आवरुनी मन ॥ पापाशीं भ्यावें रात्रंदिन । सर्वांभूती रहावें लीन ॥ राम नाम निजधन निज ध्यानें करुनी जतन ॥ निर्लोभ अक्रोध अंतःकरण ॥ राम नाम जपें रात्रं दिन स्वानंद । तत्काळ आत्मप्रचीति । पूर्ण ब्रह्मज्ञानी रत ॥ पूर्ण वेदांत सिद्धांत जाणोनी निवांत ॥ राम जाणती यथार्थ ॥ त्यासी साक्षी आहेत बहुत ॥ अनुभव सुखाची मात ॥ हीच तुमची आमची भेटी आणि गुज एकांत स्थळ । ते सांगतो तुम्हां सकळ ॥ ठेवूनि वचनावर विश्वास निर्धार ॥ श्रीराम जपावें निरंतर ॥ संसारी राखावी खबरदारी ॥ लौकीक संतती संपत्ती असावी घरीं ॥ सत्संग रात्रं दिवस करी ॥ रजतम विरहित वृत्ती ॥ तीच जाणा सत्संगती ॥ अखंड स्वानंद विवेक युक्त समाधान ॥ जन प्रीति प्राणिमात्रा लीन ॥ संसार दुःखी मानी आनंद । मान अपमान नसे कांहींच खेद । राम नाम अंतरीं बांधी ग्रंथी गांठी ॥ तीच मानी सदोदित भेटी ॥

–ज्ञानोपदेश, शके १८११ चैत्र शुद्ध ५ शुक्रवार